cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-४३ | शुक्रवार दि.२४ मे २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### निवडणूक आयोगाचा गोंधळ!

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत बहुतांश मतदारसंघांत निवडणूक आयोगाचा सावळा गोंधळ समोर आला. मतदार यादीतून नागरिकांची नावं गायब असल्याच्या प्रकाराबरोबर ईव्हीएम मशिन बंद पडून काही काळ मतदान बंद पडणे, कर्मचा-यांच्या संथगती कारभारामुळे मतदान केंद्रावर प्रचंड दिरंगाई आदी प्रकारांमुळे मतदारांनी संताप व्यक्त केला. उष्णतेचा पारा जसा वर चढत गेला तसा मतदारांचा पारा चढताना दिसला. राज्यातील पाचव्या आणि अखेरच्या टप्प्यात मतदारांत उत्साह दिसत असला तरी संथगतीने मतदान झाल्याने या उत्साहावर पाणी पडले असेच म्हणावे लागेल.

### जामीन मिळताच वेदांत अग्रवालचा रॅप साँगमधून लोकांना शिव्या?

पुणे-कल्याणीनगर अपघात प्रकरणातील आरोपी वेदांत अग्रवाल याचा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. या व्हिडीओमध्ये वेदांत अग्रवाल हा रॅप साँग गायलं असून तो लोकांना शिव्या देत आहे. दोन जीवांना संपवलं तरीही या रईस बापाच्या औलादीचा माज काही उतरलेला दिसत नाही. या रॅप साँगमधून तो हो मी आहे बिल्डरचा पोरगा म्हणून सुटलोय, असे म्हणत त्यानंतर रॅपमधून अत्यंत खालच्या पातळीवर जात शिवीगाळ करत असल्याचे दिसत आहे. सोशल मीडियालवर हा व्हिडीओ व्हायरल होत असलेला पाहायला मिळत आहे.

# बोगस बी-बियाणे, खते आढळल्यास थेट जेलवारी

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची माहिती; मराठवाड्यातील पाणीटंचाईबाबत घेतला आढावा

**संभाजीनगर । प्रतिनिधी**

**बोगस बी- बियाण्यांवरही एकनाथ शिंदे यांनी भाष्य केले आहे. बोगस बियाणे आणि खते आढळले तर थेट जेलवारी होईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. मुख्य सप्लायरचा सर्व्हे करून तपासणी करणार आणि बोगस बियाण्यांची अडचण येणार नाही. याची काळजी घेऊ. बोगस बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी सूचना दिल्या आहेत. अवकाळीचे पंचनामे करून नुकसान भरपाई दिली जाणार आहे, असेही ते म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी मराठवाड्याच्या पाणीप्रश्नासाठी बैठक घेतली. या वेळी त्यांनी मराठवाड्यातील पाणी टंचाईबाबत आढावा घेतला.**




मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठवाडा विभागातील पाणीटंचाईबाबत आढावा बैठक घेतली. निवडणूक आयोग यांच्या परवानगीने आणि आचारसंहितेचे नियम पाळून ही बैठक घेतली गेली. छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयात दुपारी ही बैठक झाली. यानंतर मराठवाड्यातील पाणी प्रश्नावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

पान २ वर

### जनावरांच्या चाऱ्यावर काय नियोजन?

» आपण चारा उगवायला पैसे दिले असता त्याचा परिणाम दिसतो. सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी बैठकीत चारा आणि पाण्याची कमतरता भासणार नाही अशी सूचना दिली. जुन्या योजना आणि जुनी बिले आणि थकित बिले देण्याच्या सूचना दिल्या आहेत. पाण्याची पातळी वाढवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. गाळमुक्त शिवार करण्यासाठी प्रयत्न करणार आहोत, असंही एकनाथ शिंदे म्हणाले.

### एकनाथ शिंदे काय म्हणाले?

» विरोधकांना आरोप करायला काय लागते? वेदांतवर आरोप केला. तेव्हाचे सरकार फक्त दोन महिन्यांचे होते. सहा लाख कोटीचे उद्योग आणले. परदेशी गुंतवणुकीत महाराष्ट्र एक नंबरवर आहे. यांच्या काळात तीन नंबर ला होते. आधी हे उद्योग पतीच्या खाली बॉम्ब लावायचे म्हणून हे पळून जायचे, असे म्हणत पुण्यातील पोर्शे अपघात प्रकरणावरून टीका करणाऱ्या विरोधकांना एकनाथ शिंदे यांनी उत्तर दिले.



## पुण्यात अनेक घटना घडल्या पण पालकमंत्री कुठे?

### सुप्रिया सुळेंचा अजित पवार यांच्यावर घणाघात





**पुणे । प्रतिनिधी**

**अल्पवयीन मुलगा वेदांतने शनिवारी मध्यरात्री दारूच्या नशेत भरधाव वेगाने कार चालवत एका बाईकला धडक दिली. दारू पिऊन भरधाव वेगाने गाडी चालवत अनिश अवधिया आणि अश्विनी कोस्थाला उडवणाऱ्या वेदांत अग्रवालचे पुढे काय होणार? याकडेच साऱ्यांचे लक्ष लागून आहे. या प्रकरणावरून राज्यात वातावरण चांगलेच तापले आहे.**

पुण्यात अनेक घटना घडल्या पण पालकमंत्री कुठे? सुप्रिया सुळे यांनी अजित पवार यांच्यावर नाव न घेता घणाघात केला.

विशाल अग्रवाल यांचा अल्पवयीन मुलगा वेदांतने शनिवारी मध्यरात्री दारूच्या नशेत भरधाव वेगाने कार चालवत एका बाईकला धडक दिली. दारू पिऊन भरधाव वेगाने गाडी चालवत अनिश अवधिया आणि अश्विनी कोस्थाला उडवणाऱ्या वेदांत अग्रवालचे पुढे काय होणार? याकडेच

पान २ वर

# भयान दुष्काळ असताना बीडमध्ये राजरोजपणे बांधकामे सुरू

## पिण्याचे पाणी २० ते २५ दिवसाने येत असताना बांधकामासाठी पाण्याची उधळपट्टी





प्रतिकात्मक

**विशेष प्रतिनिधी। बीड**

**यंदा राज्यात भयान दुष्काळ असून माजलगाव धरणात पाण्याची पातळी कमी गेल्याने २० ते २५ दिवसाने बीड शहरात पिण्याचे पाणी येत आहे. तर दुसरीकडे पिण्यासाठी पाणी मिळत नसताना बीडमध्ये मात्र राजरोसपणे बांधकामावर पाण्याची उधळपट्टी करण्यात येत असल्याचे चित्र आहे. बीड नगर पालिकेकडून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरळीत व्हावा यासाठी प्रयत्न होताना दिसत नाहीत.**

बीड शहराला माजलगाव धरणाचे पाणी येत असल्याने नेहमीच पाण्याची शहरात ओरड असते. यंदा तर दुष्काळ पडल्याने बीड शहराला २० ते २५ पेक्षा जास्त दिवसाने पाणी पुरवठा करण्यात येत आहे. आजचे पाणी चार दिवसाने पिण्यायोग्य राहत नाही. बीडमध्ये तर पिण्याचे पाणी महिनाभरानंतर नळाला येते. त्यामुळे साठवणूक करुन पाणी ठेवले तरी ते पाणी पिण्यायोग्य चार ते पाच दिवस राहते. त्यानंतर हे पाणी खराब होते. एकीकडे पिण्यासाठी पाणी नसताना बीड शहरात मात्र घरांचे बांधकामे

पान २ वर

### नगर पालिका प्रशासनाचे दुर्लक्ष

बीड शहराला वेळेत आणि चांगले पाणी देण्याची जबाबदारी नगर पालिकेची असून याकडे सध्या मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष करण्यात येत आहे. नगर पालिकेवर सध्या प्रशासक असल्याने मनमानी कारभार सुरु असून शहराला पाणी नियमितपणे देणे गरजेचे असताना महिनाभरानंतर पाणी येत असल्याने नागरीकांमध्ये नाराजी आहे.

### अधिकाऱ्यांनीही महिनाभर साठवलेले पाणी प्यावे

शहरात बहुतांश भागात महिनाभरानंतर नगर पालिकेच्या नळाला पाणी येते. हे पाणी नागरीक साठवून ठेवत ते पाणी महिनाभर पिण्यासाठी वापरतात. त्यामुळे त्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. नगर पालिकेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सुध्दा महिनाभर साठवूण ठेवलेले पाणी पिण्यासाठी वापरावे, अशी मागणी होत आहे.

## बारामतीत दोन भावांमध्ये जुंपणार?

बारामती : बारामतीत लोकसभेचा निकाल कोणाच्या दिशेने लागणार? अशी चर्चा सुरू असताना आता विधानसभेची तयारी सुरू झाली आहे. बारामतीची लढाई आता दोन भावांमध्ये जुंपणार का? असा सवाल विचारला जात आहे. बारामती विधान सभा मतदार संघात युगेंद्र पवार आणि जय पवार असा सामना होणार असल्याचे चित्र आहे. दोघेही त्या दृष्टीने तयारीला लागले असल्याचे दिसते.

एकीकडे राष्ट्रवादीच्या शरदचंद्र पवार गटाकडून युगेंद्र पवार यांनी जनता दरबाराचे आयोजन करत नागरिकांच्या समस्या

पान २ वर

# गेल्या १० वर्षापासून अण्णा हजारे गप्प का?

## रोहित पवार यांचा सवाल; आताच शांत कशासाठी?





**पुणे । प्रतिनिधी**

२०१४ पूर्वी अण्णा हजारे यांना काँग्रेस सरकारच्या काळात आपण अनेकदा आंदोलन करताना पाहिले. छोटं टूक वाजलं तरी अण्णा हजारे आंदोलन करायचे. मात्र भाजप सरकारच्या काळात इलेक्ट्रॉल बॉण्डचा घोटाळा झाला. ॲम्बुलन्स घोटाळा झाला. शेतकरी हवालदिल आहेत. बेरोजगारीचा प्रश्न गंभीर बनला आहे. मणिपूरमध्ये आणि महाराष्ट्रात महिलांवरती अत्याचार सुरू आहेत. अशावेळी

पान २ वर

### निवडणुकीवर काय म्हणाले?

महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांनी एक व्हीडिओ ट्विट करत ईव्हीएम मशीन ठेवलेल्या स्ट्राँग रूमच्या सीसीटीव्ही कॅमेरेबाबत छेडछाडीचा आरोप केला होता. त्यावर रोहित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्या स्ट्राँगरूमला एवढी मोठी सुरक्षा यंत्रणा असतांना तिथे एखादी व्यक्ती जातेच कशी? सुप्रिया सुळे यांच्या निवडणुकीचे ईव्हीएम ज्या ठिकाणी ठेवलेत ते देखील सीसीटीव्ही बंद झाले होते. शिरूरमध्ये देखील तसाच प्रकार झाला. जर अशा पद्धतीने निवडणूक आयोगाकडून हलगर्जीपणा होत असेल तर त्यांच्या कार्यपद्धतीबाबत शंका आपण घेऊ शकतो, असे रोहित पवार म्हणाले. अहमदनगरच्या जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या स्पष्टीकरणावरून रोहित पवार यांनी अप्रत्यक्षपणे जिल्हाधिकारी यांना इशारा दिला. हा जर तुम्ही सत्ताधाऱ्यांचा ऐकत असाल तर उद्या महाविकास आघाडीची सत्ता आल्यानंतर अशा लोकांचे काय करायचे हे आम्ही पाहू असा सज्जड दमच रोहित पवार यांनी दिला.

# माजलगाव धरण मृतसाठ्यात गेल्याने मासेमारी व्यवसाय संकटात

## दुष्काळी स्थितीमुळे धरणात पाणी नसल्याने मासेही नाहीत

**माजलगाव । प्रतिनिधी**

**मागील चार ते पाच वर्षापासुन सतत माजलगाव धरण भरत होते परंतु यावर्षी झालेल्या अत्यल्प पावसामुळे माजलगाव धरण भरले नाही. धरणातुन पिण्यासाठी तसेच अवैधरित्या झालेल्या पाणी उपशामुळे माजलगाव धरण मृत साठ्यात गेले आहे.त्यामुळे पाण्याअभावी मच्छिमारीचा व्यवसाय करणाऱ्यांवर संकट ओढावले आहे.या मच्छिमार व्यावसायिकांसमोर आता उपजीविकेचा प्रश्न उभा राहिला आहे.**

जायकवाडी धरणाचा दुसरा टप्पा म्हणुन ओळख असलेले धरण अशी माजलगाव धरणाची ओळख आहे.या धरणातील मासे खायला चविष्ट असल्याने मोठ्या प्रमाणात मासे बाजारात विक्रीस असतात. धरणातील मासे परजिल्ह्यात विक्री केले जातात यामधून पाचशे ते सातशे कुटूंबीयांना रोजगार मिळतो.तर गोड्या पाण्यातील मासे म्हणुन धरणातील माशांना विशेष पसंती खवय्यांमधून आहे. यावर्षीच्या पावसाळ्यात तालुका परिसरात



तसेच धरण कार्यक्षेत्रात सरासरीपेक्षा निम्यानेच कमी पाऊस पडल्याने धरणात पाणीसाठा उपलब्ध झाला नाही.धरणाचे क्षेत्र ७ हजार हेक्टरवर आहे.एवढ्या क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात भोई बांधव मासेमारी करतात.परंतु पावसाअभावी निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे धरण मृत साठ्यात गेल्याने धरणाच्या दोन हजार हेक्टरवरच सध्या पाणी उपलब्ध आहे. त्यामुळे फक्त शंभर भोई बांधवांना

पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२२ मे २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू : २४.५० क्विंटल | २,१०१ | २,९९० | २,५२० |
| ज्वारी/हायब्रिड : ११२.५० क्विंटल | १,२५० | २,८३० | २,४०२ |
| मूग : ०.५० क्विंटल | ९,८५० | ९,८५० | ९,८५० |
| तूर : ५.५० क्विंटल | १०,७९० | ११,४५१ | ११,१८० |
| उडीद : २.५० क्विंटल | ७,४०० | ७,४०० | ७,४०० |
| बाजरी: ८.०० क्विंटल | १,९०० | २,७२० | २,४२८ |
| चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल | १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीन: ६१.०० क्विंटल | ४,४८० | ४,५६० | ४,५४० |
| हरभरा: १.०० क्विंटल | २९.०० | ५,८५० | ६,००० |

# एका दिवसात गुंतवणूकदार मालामाल!

## » निफ्टी पहिल्यांदाच २२८०० च्या पुढे, सेन्सेक्सही ७७० अंकांनी वधारला!



**मुंबई । प्रतिनिधी**

**एकीकडे लोकसभा निवडणुकीमुळे बाजारात काहीशी अस्थिरता आहे. मात्र आज २३ मे २०२४ रोजी शेअर बाजारात मोठी तेजी पाहायला मिळाली. आज इतिहासात पहिल्यांदाच निफ्टीने २२८०० अंकाच्याही पुढे झेप घेतली. तर सेन्सेक्समध्येही ८१६ अंकांची तेजी पाहायला मिळत आहे.**

शेअर बाजारात गेल्या तीन दिवसांत खास काही घडले नाही. मात्र गुरुवारचा दिवस शेअर बाजारात मोठ्या घडामोडी घडल्या. हा दिवस गुंतवणूकदारांसाठी खास ठरला. या दिवसाच्या सुरुवातीपासून बाजारात तेजी पाहायला मिळाली. पुढे मुंबई शेअर बाजार तसेच राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देश चढाच राहिला. मुंबई शेअर बाजार अर्थात बुधवारी ७४,२२१ अंकांवर बंद झाला होता. तर गुरुवारी हाच बाजार ७४,२५३ वर चालू झाला. अचानकपणे या निर्देशांकात सकारात्मक बदल दिसायला लागले. सकाळी ११.३० वाजता बीएसई ४४४.२३ अंकांनी उसळून थेट ७४,६६५.२९ वर पोहोचला आहे. दुपारी १.१२ वाजता बीएसई ८१६.८५ अंकांच्या तेजीसह ७५०३७.९१अंकांवर पोहोचला.

### निफ्टीने चरला इतिहास

» आज गुरुवारी बाजार चालू झाल्यानंतर निफ्टी २२६१४ अंकांवर होता. काही क्षणांत हा निर्देशांक २२८०० अंकांवर पोहोचला. बुधवारी निफ्टी २२,५९७.८० अंकावर बंद झाला होता. याआधी निफ्टीने २२८०० हा आकडा कधीही पार केलेला नव्हता. दुपारी १.१६ वाजता निफ्टीने २२८३६.८५ अंकांपर्यंत झेप घेतली. बाजार बंद होईपर्यंत निफ्टी आणि सेन्सेक्समध्ये आणखी घडामोडी घडण्याची शक्यता आहे.

### या शेअर्समध्ये तेजी

» निफ्टीने ऐतिहासिक टप्पा गाठल्यामुळे अदाणी एंटरप्रायझेसच्या शेअर्समध्ये तेजी पाहायला मिळाली. सध्या हा शेअर ३३६५ अंकावर पोहोचला आहे. त्यानंतर ॲक्सिस बँक, एल अँड टीच्या शेअर्समध्ये तीन टक्क्यांची तेजी पाहायला मिळाली. मीडकॅप सेगमेंटमध्ये सध्या रेल्वेशी संबंधित स्टॉक्स चांगल्या स्थितीत आहेत. च्या शेअर्समध्ये ८ टक्क्यांची तेजी पाहायला मिळाली. तर च्या शेअर्समध्ये ७ टक्क्यांची तेजी आली.

cmyk

## अग्रलेख

# निवडणूक आयोगाचा गोंधळ!

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत बहुतांश मतदारसंघांत निवडणूक आयोगाचा सावळा गोंधळ समोर आला. मतदार यादीतून नागरिकांची नावं गायब असल्याच्या प्रकाराबरोबर ईव्हीएम मशिन बंद पडून काही काळ मतदान बंद पडणे, कर्मचा-यांच्या संथगती कारभारामुळे मतदान केंद्रावर प्रचंड दिरंगाई आदी प्रकारांमुळे मतदारांनी संताप व्यक्त केला. उष्णतेचा पारा जसा वर चढत गेला तसा मतदारांचा पारा चढताना दिसला. राज्यातील पाचव्या आणि अखेरच्या टप्प्यात मतदारांत उत्साह दिसत असला तरी संथगतीने मतदान झाल्याने या उत्साहावर पाणी पडले असेच म्हणावे लागेल. संथगतीने मतदान झाल्याने मुंबई आणि उपनगरांत अनेक ठिकाणी मोठमोठ्या रांगा लागल्या होत्या. उन्हाचा तडाखा आणि मोठ्या रांगा पाहून अनेक मतदारांनी मतदान न करताच घरी परतणे पसंत केले. या गोंधळामुळे मतदानाचा टक्का घसरण्यास हातभार लागला असे म्हणता येईल. संथगतीने मतदान प्रक्रिया आणि मतदानाच्या ठिकाणी पुरेशा सोयी नसल्याने निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर सर्वपक्षीय नेत्यांनी नाराजी व्यक्त केली. मतदान कमी झाले याला मतदार तर जबाबदार आहेतच,

परंतु ब-याच अंशी मतदान केंद्रावरील कर्मचा-यांना मतदानासंदर्भातील पुरेसे प्रशिक्षण देण्यास निवडणूक आयोग कमी पडले हे ही तितकेच खरे! लोकसभा निवडणुकीत मुंबईत ४५ ते ५० टक्के मतदान झाले ही चिंतेची बाब आहे. या घसरलेल्या टक्केवारीस झोपडपट्टी आणि जुन्या चाळीची मोठ्या प्रमाणावर सुरू असलेली पुनर्विकासाची कामे जबाबदार असावीत. या कामामुळे हजारो कुटुंबे आपल्या मूळ घरापासून दूर ठिकाणी रहावयास गेली आहेत. त्यामुळे खास निवडणुकीसाठी रेल्वेचा प्रवास करून मतदानासाठी येणे मतदारांनी टाळले असावे. निवडणूक पार पडल्याने निवडणुकीनंतरचे कवित्व असेच सुरू राहणार! निवडणूक आयोगाने मतदारांना जागृत करण्यासाठी अनेक अभियान राबवून सर्वतोपरी प्रयत्न केले. तरीसुद्धा पाचव्या टप्प्यातील मतदान ५० टक्क्यांपर्यंत पोहोचणे कठीण झाले. याला चुकीच्या मतदार याद्यादेखील कारणीभूत आहेत. जुन्या मतदारांची नावे गहाळ होणे, मृत मतदाराचा अर्ज भरून देखील अनेक वर्षे मृत व्यक्तीचा यादीत समावेश होणे तसेच इमारत सोडून गेलेल्या मतदारांची नावे मतदारयादीत दुरुस्त न झाल्याने व्हायचा तो गोंधळ झाला. त्यामुळे केवळ मतदारांना दोष न देता मतदार याद्यांचे ढिसाळ व्यवस्थापन देखील तेवढेच कारणीभूत होते.

देशात नवनवीन तंत्रज्ञान विकसित होत असताना आपण मतदान याद्या अद्ययावत बनविण्यासाठी बदलाचे पाऊल कधी उचलणार आहोत? निवडणुकीसाठी लागणारा कोट्यवधीचा खर्च हा जनतेच्या कररूपी पैशामधून केला जात असताना अस्तित्वात नसलेल्या मतदारावर खर्च करणे कितपत योग्य आहे? आधार कार्ड आणि पॅन कार्ड क्रमांकावरून कोणत्याही व्यक्तीची माहिती मिळत असताना, मतदान कार्डाला आधार कार्डाशी जोडणे सक्तीचे का केले जात नाही? आगामी विधानसभा आणि महापालिका निवडणुकांपर्यंत मतदार याद्या दुरुस्त झाल्या तरच मतदानाची अचूक टक्केवारी लोकांच्या समोर येईल. पाचव्या टप्प्यातील मतदानाची टक्केवारी या आठवड्याच्या अखेरीला निवडणूक आयोग जाहीर करेल असा अंदाज आहे. पहिल्या टप्प्याची टक्केवारी मतदानानंतर ११ दिवसांनी, दुस-या टप्प्यातील टक्केवारी आठ दिवसांनी, चौथ्या टप्प्याची चार दिवसांनी जाहीर करण्यात आली. मतदानाच्या दुस-या दिवशी जाहीर केलेल्या टक्केवारीत आणि नंतर जाहीर करण्यात आलेल्या टक्केवारीत प्रचंड तफावत दिसून येते. त्यामुळे विनाकारण संभ्रम निर्माण होतो. निवडणुकीआधी निवडणूक आयोगासह अन्य सरकारी यंत्रणा 'मतदान करा'अशी जनजागृती करीत होत्या. या जाहिरातबाजीमुळे पाचव्या आणि अखेरच्या टप्प्यात मतदानाचा टक्का वाढेल असा अंदाज होता परंतु सर्वच मतदारसंघांत मतदानाचे आकडे जेमतेम ५० टक्क्यांच्या आसपास राहिले.

म्हणजेच लोकशाहीतील या सर्वांत महत्त्वाच्या प्रक्रियेपासून निम्मे मतदार दूरच राहिले. निवडणूक आयोग, राजकीय पक्ष, सर्वपक्षीय उमेदवार आणि सामाजिक संस्था-संघटनांनी केलेल्या मतदानाच्या आवाहनाकडे देशातील निम्म्या नागरिकांनी पाठ फिरवली. निवडणूक आयोग ज्या पद्धतीने मतदानाचा आग्रह करीत होते, त्यावरून मतदारांना सुलभपणे मतदान करता येईल अशी अपेक्षा होती, परंतु ब-याच ठिकाणी ती सपशेल फोल ठरली. प्रत्यक्षात मतदानाच्या दिवशी अनेक मतदान केंद्रांवर गोंधळ उडाला. या गोंधळाची विविध कारणे होती. हा गोंधळ का झाला याची दखल निवडणूक आयोगाने घ्यायला हवी. जाहिरातबाजी करून आणि मतदानाचे महत्त्व पटवून मतदान करण्यास भाग पाडणा-या निवडणूक आयोगावर मतदान करण्यास आलेल्या प्रत्येक नागरिकाला मतदान करू देण्याची जबाबदारीही आहे. अनेक मतदान केंद्रांवर सोयीसुविधांचा अभाव होता त्यामुळे गोंधळ उडाला. असाच गोंधळ उडणार असेल तर 'वन नेशन वन इलेक्शन' कसे घेणार? ऐन उन्हाळ्यात होणा-या या निवडणुकीची आवश्यक ती तयारी होणे अपेक्षित होते. अनेक केंद्रांमध्ये निवडणूक कर्मचा-यांत प्रशिक्षणाचा अभाव असल्याचे दिसून आले. निवडणूक प्रक्रियेला सामोरे जाताना आयोगाने यासंबंधीची पडताळणी आधीच का केली नाही? निम्मे मतदान झाले तर इतका गोंधळ उडाला, अधिक प्रमाणात मतदान झाले असते तर किती गोंधळ उडाला असता? सारी व्यवस्थाच कोलमडली असती! महासत्तेकडे वाटचाल करणा-या देशाला अशी गोंधळात गोंधळ घालणारी निवडणूक प्रक्रिया अजिबात शोभादायक नाही. निवडणूक आयोग ही स्वायत्त यंत्रणा आहे. तिच्यावर निष्पक्षपणे पारदर्शकता ठेवून निर्भीडपणे निवडणुका घेण्याची जबाबदारी आहे. मात्र सध्याचा निवडणूक आयोग अनेक कारणांमुळे वादग्रस्त ठरत आहे. सत्ताधारी भाजप सरकारला झुकते माप दिल्याने आयोग भाजपसाठी काम करतो आहे काय अशी शंका उत्पन्न होते. माजी निवडणूक आयुक्त टी.एन. शेषन यांनी निवडणूक आयुक्त कसा असावा आणि निवडणूक आयोगाची ताकद काय आहे ते देशाला दाखवून दिले होते. सध्याच्या निवडणूक आयोगाने त्यांचे अनुकरण करावयास हवे.

# माजलगावात सहा तासात घरफोडीचा लावला तपास

**माजलगाव । प्रतिनिधी**

**शहरातील शाहुनगर येथील दि २२ मे बुधवार रोजी पाहटे ३;३० वाजता झालेल्या घरफोडी झाली होती.याप्रकरणी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात दि २३ मे गुरुवार रोजी दुपारी १:०० वाजण्याच्या सुमारास गुन्हा दाखल होऊन पोलीसांनी तपासाची चक्रे फिरवत अवघ्या ६ तासांत आरोपीस ताब्यात घेऊन त्यांच्याकडून घरफोडीतील मुद्देमाल जप्त करुन सांयकाळी फिर्यादीस सुपुर्त केला.**

याप्रकरणी पोलीस सुत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, आजित रामभाऊ जगताप रा.शाहुनगर माजलगाव येथील विधीज्ञ व त्यांची पत्नी नामे पुजा व मुलगी आरोही हिस शाळेला उन्हाळी सुट्टी आसल्यामुळे चार दिवसापुर्वी त्यांच्या मुळगावी सावरगाव या ठिकाणी गेलो होते व फिर्यादी सावरगाव ते माजलगाव न्यायालय येथे येणे-जाणे करीत होते.दिनांक २२ मे बुधवार रोजी दुपारी ०३:३० सुमारास फिर्यादीचे माजलगाव शिवाजी महाराज चौक भानुदास कॉम्पलेक्स शाहुनगर येथील माझे घरी आले व ०४:३० वाजण्याच्या सुमारास घरातील पाणी भरून घराच्या मेन गेटला कुलूप लावुन न्यायालय माजलगाय येथे गेले.माजलगाव न्यायालय येथील कामकाज करून ते परत सावरगाव या ठिकाणी गेले. दिनांक २३ मे गुरुवार रोजी सकाळी ०८:३० वा सुमारास फिर्यादी सावरगाव या ठिकाणी असताना त्यांची चुलती मिनाक्षी लक्ष्मण जगताप हिचा त्यांच्या पत्नीस पुजा हिस फोन आला की, घराच्या किचनचा व जिन्याचा दरवाजा तुम्ही बंद केला होता का?अशी विचारणा केली.तेव्हा फिर्यादीच्या पत्नीने सर्व दरवाजे बंद केले होते असे सांगितले.तेंव्हा फिर्यादी लगेच माजलगाव येथील घरी आले व घरात जावुन पाहिले तर त्यांच्या घराचा किचनचा दरवाजा उघडा दिसला त्यानतर त्यांनी घराचे जिन्यावर जावुन पाहिले असता जिन्याचा एक दरवाजा उघडा व एक दरवाजा बाहेरून लावलेला दिसला त्यांनी घरात खाली येवुन घरातील वस्तुची पाहणी केली असता त्यांना किचन रूम मधील कपाटाचा दरवाजा लावलेल्या स्थीतीत उघडा होता.त्यांनी कपाटाची पाहाणी केली असता कपाटामधील सोने ठेवण्याचे ड्रावर उघडे दिसला त्यांनी त्यामध्ये ठेवलेले सोन्याची तीन तोळ्याची चैन,तीन तोळ्याचे ब्रास्लेट,पत्नीच्या कानातील रिंग, झुंबर,नाकातील नथनी,मुलीच्या कानातील रिंग, मुलीचे हातातील सोन्याचे एक तोळ्याचे कडे असे दिसुन आले नाही तसेच ड्रावर मध्ये ठेवलेले नगदी ७५००/- रूपये हे ही दिसले नाही तेंव्हा त्यांनी आजुबाजुला घरामध्ये पाहिले असता तेथेही दिसले नाहीत, त्यामुळे त्यांना चोरी झाल्याची खात्री झाली की,आम्ही घरी नसल्याने रात्रीचा फायदा घेवून कोणीतरी अज्ञात चोरट्याने सोने व रोख रक्कम चोरून घेवुन गेले आसल्याचे लक्षात आले. सोन्याचे दागीने व नगदी रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरट्याने आम्ही घरी कोणी नसल्याचे पाहुन रात्रीचा फायदा घेवुन दिनांक २२ मे बुधवार रोजीचे सायंकाळी ०४:३० वाजण्याचे नंतर ते दिनांक २३ मे गुरुवार रोजीचे सकाळी ०८:३० वाजण्याच्या दरम्यान घर फोडून चोरून नेला आहे.अशा अशायाच्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपी विरोधात गु.र नं ९३/२०२४,कलम ४५४,४५७,३८० भांदवी नुसार माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.याप्रकरणी पोलीसांनी तपासाची चक्रे गतीने फिरवत अवघ्या साहा तासांत घरफोडीतील आरोपी निष्पन्न करुन ताब्यात घेऊन आरोपींकडून पुर्ण मुद्देमाल जप्त करुन सदर मुद्देमाल फिर्यादीस सुपुर्त केला. हि दमदार कारवाई माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक केतन राठोड, पोलीस उपनिरीक्षक के.डी.माकणे, पोलीस उपनिरीक्षक सतीष दिडे,पो.कॉ.गणेश तळेकर,पो.कॉ.मुंजाबा कुहारे,पो.कॉ.तोटेवाड यांनी केली.या दमदार कारवाईने माजलगाव शहर पोलीसांचे कौतुक केले जात आहे.

# आई वडिलांची सेवा हीच ईश्वर सेवा-योगीराज महाराज रामगडकर

## खांडे पारगाव येथे अखंड हरी नाम सप्ताह संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

खांडे पारगाव येथे दर वर्षी प्रमाणे अखंड हरी नाम सप्ताह संपन्न झाला या वेळी ह.भ.प. गुरुवर्य स्वामी योगीराज महाराज महत श्री क्षेत्र रामगड यांनी काल्याच्या कीर्तनात आई वडिलांची सेवा हीच ईश्वर सेवा आहे पुंडलिकाने आई वडिलांची सेवा केली साक्षात परमेश्वर पडूरांग त्याच्या घरी आला तरी त्याने आई वडिलांची सेवा सोडली नाही म्हणून आज जगाचा मालक हा पांढरपुरत अठ्ठावीस युगे वेठेवरी उभा आहे तरुणाने आई वडिलांच्या सेवेला प्राधान्य द्यावे समाजामधील वृध्दाश्रम संस्कृती बंद झाली पाहिजे अशी भावना ह.भ.प. स्वामी योगीराज महाराज रामगडकर यांनी व्यक्त केली या वेळी गायक , वादक भाजणी मंडळी भाविक भक्त उपस्थित होते अखंड हरी नाम सप्ताह मध्ये सात दिवस विष्णू सहस्त्रनाम, गाथा भजन, भावार्थ रामायण, रात्री नऊ ते अकरा वेळेत हरी कीर्तन संपन झाले पंचकृषी मधील भाविक भक्त वारकरी टाळकरी ग्रामस्थ उपस्थित होते.


# दोन दिवसांची नजरकैद

मराठवाड्यात सूर्य आग ओकतोय, अन इकडं लंडनला दोन दिवस पाऊस ''कोसळतोय'' .. कोसळतोय म्हणजे, आपल्या सारखा ''धिंगाणा'' घालतोय असं नाही.. इथं माणसं ज्या शिस्तीत जगतात तसा पाऊसही शिस्तीत पडतोय..अगदी आवाज न करता .. घरात बसलं तर बाहेर पाऊस पडतोय हे ही कळत नाही..शांतपणे त्याचं पडणं सुरू असतं.. रिमझिम वगैरे.. सडक ओली करतोय एवढंच .. पाणी साचलंय, गटारं तुंबलीत असं दृश्य इकडं कधी दिसत नाही..आत्ताही नाही.. आभाळ गच्च भरलेलं आहे.. कधीही जोराचा पाऊस कोसळेल असं वातावरण .. मात्र तसं होतं नाही.. पाऊस आपली लय सोडत नाही.. हवा कुंद, पावसाळी..आंबोलीच्या धबधब्यावर असल्यासारखी.. म्हणून दोन दिवस सूर्यनारायणाचं दर्शनच नाही.. लपून, छपून का होईन सूर्य ढगातून डोकं वर काढेल म्हणून अनेकदा खिडकीत जातो, येतो.. पण छे.. सूर्यच दिसत नाही.. आजही सूर्यदर्शनाची शक्यता नाही.. आभाळ भरलेलंच आहे.. अगदी काळाकुट्ट आहे.. रिमझिम पाऊस अन सोबतीला वारा असलयानं बरयापैकी थंडी जाणवतेय.. आमच्या घराच्या खिडक्या कधी उघडतच नाहीत..खिडकी उघडली की, गार, झोंबणारा वारा आत येतो म्हणून ही काळजी ..

घर छानच आहे.. समोर मोठा रस्ताय .. गॅलरित उभं राहून रस्त्यावरची वर्दळ, ''लंडनचं सौंदर्य'' न्याहाळता येऊ शकतं... मी दोन, तीन वेळा गॅलरित गेलो तर, शोभना ओरडली, ''आत या, आजारी पडाल'' .. गुपचूप आदेश ऐकून घरात परतलो.. पुण्यात मला तशी सवय आहे.. फोन आले की, गॅलरित जातो अन गप्पा मारत तासंतास उभं राहतो.. पण इथं झोंबणारा गार वारा आणि बायको ही परवानगी देत नसल्यानं काचेच्या बंद खिडकीतूनच समोरचा देखावा पहात राहणं भाग असतं.. भरलेल्या आभाळाचे अनेक फोटो काढून झाले.. आभाळ लंडनचं असलं म्हणून काय झालं? फोटो तरी किती काढणार नं? पावसापेक्षा उन्हाळ्याची जवळीक असलेल्या आपल्या सारख्यांना हे वातावरण कसं वाटत असेल? एक, दोन दिवस ठीक असतं.. वातावरण रोमँटिक वगैरे वाटतं पण नेहमीच ही परिस्थिती म्हटल्यावर कठीणच की..? पण मग घरात तरी किती वेळ बसणार? करणार काय? हे प्रश्न किमान आमच्यासारख्या वयस्करांना हमखास पडतच असतील? तरी बरंय आमची गोड पिल्लु आमच्या सोबत आहे..तिच्यासोबत बोबडे बोल बोलताना कसा वेळ जातो ते कळत नाही.पिल्लू फारच गोडंय.. अगदी जपानी गुडिया.. लंडनच्या बाळांसारखी.. गोरी गोरी, नाजूक..

पिल्लूशी बोलताना मी पण तीन महिन्यांचा होऊन जातो..(आज तिचा तिसरा मासिक वाढदिवस) तिचं एक गोड हसणं देखील आपलं जीवन सार्थकी लागलं याची जाणीव करून देणारं असतं.. ''सुख म्हणजे यापेक्षा वेगळं काय असतं''? असा प्रश्न मग मी माझ्या मनालाच विचारतो.. आठ दिवसात पिलुचा लागलेला लळा पाहून शोभना म्हणाली, सागर, सुधांशू लहान होते, तेव्हा एवढा वेळ त्यांना नाही दिलास कधी..कधी बोबडे बोलही बोलला





लंडनचा पाऊस

नाहीस.. हो हे खरंय..शोभनाचा आरोप खोटा नाही..'' परिस्थिती का मारा'' होतो तेव्हा मी..

सागर जन्मला तेव्हा नांदेडच्या लोकपत्रचं लाँचिंग झालं होतं.. त्यामुळं तो जन्मल्यानंतर २५ दिवस त्याला भेटायलाही मला सोलापूरला जाता आलं नाही..आज ३०-३२ वर्षे होऊन गेली तरी बायको यावरून टोमणे देतच असते.. ते टोमणे मला मुकाट्यानं सहन करावे लागतात .. चूक तर झालेली होतीच की.. सागर नांदेडला आला पण नंतर आमच्या पाचवीला पुजलेला संघर्ष सुरू झाला... सागरचं बालपण बघता बघता हातून कसं निसटून गेलं ते कळलंच नाही.. त्याच्याबरोबर लहान होऊन जगताच आलं नाही.. कोड - कौतूक ही करता आलं नाही.. सुधांशूच्या जन्माच्या वेळेस आम्ही अलिबागला होतो.. तिथं संघर्ष नव्हता पण कधी नोकरी सोडावी लागेल याची भिती कायम डोक्यावर असायची.. शिवाय तिथं बातम्या, आंदोलनात, सामाजिक कार्यात एवढा व्यस्त असायचो की, मुलांबरोबर वेळ घालवू शकलो नाही..त्यामुळं दोघांचंही बालपण मला जगता आलं नाही.. त्यांना शाळेत सोडायला जाणं, त्यांच्या पॅरेन्ट मिटिंगला हजेरी लावणं, त्यांच्या गॅदरिंगला जाणं.. हे सारं मी मीस केलं.. हा सारा बॅकलॉग मला आता आमच्या आध्याच्या माध्यमातून भरून काढायचाय.. हातातून निसटलेले ते अनमोल क्षण मला पिल्लू सोबत जगायचे आहेत.. त्यामुळं जराही पर्वा न करता सारी शेतीवाडी, घरदार सारं सोडून मी दूरदेशी आलोय.. पिल्लुला भरपूर वेळ देतोय.. तिचं एक स्मित देखील मला स्वर्गसुखाचा आनंद मिळवून देतंय .. नातवंडांना ''दुधावरची साय'' का म्हणतात ते आज मला कळतंय? पिल्लू बरोबरचे माझे हे दिवस माझ्या जीवनातील सर्वात आनंदाचे दिवस आहेत..हे नक्की..

मस्त एन्जॉय करतोय..

पण पिल्लूबरोबर किती वेळ खेळणार? तिचीही दिनचर्या ठरलेली असते.. तिची पथ्ये, तिचं झोपणं सारं ठरलेलं असतं.. हा वेळ कंटाळवाणा असतो.. वेळ जाता जात नाही.. मग पुण्याची आठवण येते.. झालेला अपघात त्यानं उठलेल्या धुराळयाच्या सर्व बातम्या वाचतो . एखादा अपघात राजकारणाचा विषय कसा होऊ शकतो? नालायकांनो, ज्यांची मुलं गेलीत त्यांच्या भावनांचा तरी विचार करायचा की.. एक घटना घडली, तशी पुन्हा होणार नाही यावर कठोर उपाययोजनांवर चर्चा सोडून विषय भलत्याच दिशेनं नेला जातोय..मी सातासमुद्रापार आहे पण पुण्यात घडत असलेल्या घटना पाहून माझं संवेदनशील मन मनातल्या मनात का होईना अस्वस्थ होत राहतं.. , संताप व्यक्त करीत राहतं..

बाकी राजकीय घडामोडींवर लक्ष असतंच..काही वेळ मग हास्यजत्रा बघतो, काही वेळ तारक मेहताचे जुने इपिसोड बघण्यात जातो.. फेसबुकवर चित्र विचित्र रिल्स बघण्याचाही गेल्या आठ दिवसात मला नाद लागलाय..एवढं झाल्यावरही वेळ शिल्लक राहतोच की.. लंडनमध्ये सध्या तब्बल १६-१७ तासांचा दिवस आहे.. ७-८ तासांची रात्रंय..म्हणजे दिवस मोठा, रात्र छोटी.. सकाळी ५.०१ मिनिटं ही सूर्योदयाची वेळ.. सूर्यास्त होणार रात्री ८.५३ वाजता.. आभाळा एवढा दिवस, बाहेर पडायला मार्ग नाही.. नजरकैदेत असल्यासारखं.. मग घरात बसून चहा, कॉफीचा मारा.. इकडं मद्य का स्वस्त आहे आणि इंग्रज दररोज रात्री दोन पेग घेऊन का झोपतात याचं कारण मला सापडलं.. इथलं हवामानच तसं आहे.. रात्री सगळे बार फुल्ल असतात आणि इंग्रज छान खात.. पित बसलेले असतात.. आम्ही पडलो सोवळयातले.. मग तल्लफ चहा, कॉफीवर भागविणार नाही तर आणखी काय? शोभना म्हणाली, ''एक बरं झालं तुला फुल्ल आराम मिळतोय.. तिकडं एक दिवसही आराम करीत नाहीस'' .. पण आराम माझ्या स्वभावात नाही.. अन असा सक्तीचा आराम उपयोगाचा नाही.. त्यामुळं खिडकीत जाऊन, पाऊस थांबण्याची वाट बघत असतो.. ..पाऊस थांबायचं नाव घेत नाही म्हटल्यावर .. काल रात्री शोभनाला म्हटलं'' चल लंडनचा पाऊस अंगावर घेऊ''.. खरं तर पावसात भिजण्याचं आमचं हे वय नाही, रूपलही म्हणाली बाबा सर्दी होईल.. तरीही रेनकोट काढले अन दूरवर जात मुकपणे बरसणारा पाऊस एन्जॉय केला..छान, चिंब भिजून आलोत..

लंडनचं हवामान खातं बरंच खरं बोलतं..

आज हवामान ढगाळ असेल पण पाऊस नसेल असा हवामान खात्याचा अंदाज आहे.. रूपल म्हणाली , ''हवामान खात्यावर विश्वास ठेवायला हरकत नाही'' .. त्यामुळं इथं जवळ कुठं तरी जाण्याचा बेत ठरतोय..

बघू यात काय होतंय ते..

लंडनमधील वास्तव्यात प्रत्येक क्षण मला जगायचा आहे.. एक मिनिटही वाया घालायचं नाही असं मी ठरवलंय.

**एस.एम.देशमुख**

## पान १वरून...

### बोगस बी-बियाणे, खते

यांनी माध्यमांशी संवाद साधला. पाणी चारा आणि अवकाळी नुकसानसाठी ही बैठक होती. मराठवाड्यात १८३७ टँकर सुरू आहेत. टँकरची किंवा चाऱ्याची आवश्यकता वाढली तर संपर्क करण्याबाबत सूचना दिल्या. तीन दिवसात याबाबत तजबिज केली जाणार आहे, असे एकनाथ शिंदे म्हणाले. निवडणुका येतात-जातात. पण शेवटी शेतकरी आपला त्याला अडचण होऊ नये. परवानगी मागितली त्यांनी परवानगी दिली. हे सरकार आपल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणारे असून एकटे सोडणार नाही, असेही एकनाथ शिंदे म्हणाले. तसेच बोगस बी-बियाणे आणि खते आढळून आल्यास थेट जेलमध्ये टाकण्यात येईल, असा इशारा मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिला. त्यामुळे असा बोगस प्रकार करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

----------

### भयान दुष्काळ असताना बीडमध्ये

राजरोसपणे सुरु असल्याचे चित्र आहे. बाधकामावर दररोज हजारो लिटर पाणी वापरले जात असताना दोन-चार लिटर सुध्दा पिण्याचे पाणी मिळत नसल्याचे वास्तव आहे. बांधकामावर खऱ्या अर्थाने निर्बंध आणायला हवेत, अशी मागणी होत आहे.

--------

### पुण्यात अनेक घटना

साऱ्यांचे लक्ष लागून आहे. या प्रकरणावरून राज्यात वातावरण चांगलेच तापले आहे. दरम्यान, यावर शरद पवार गटाच्या नेत्या सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. पुण्यामध्ये अनेक घटना घडल्या आहेत पण पुण्याचे पालकमंत्री कुठे? असा सवाल शरद पवार गटाच्या नेत्या सुप्रिया सुळे यांनी केला असून अजित पवार यांच्यावर अप्रत्यक्षपणे निशाणा साधला. तर देवेंद्र फडणवीस नेमकं कोणाबद्दल बोलत होते? राजकीय दबाव नेमका कुणाचा? असा सवाल करत फडणवीसांनी याचं उत्तर द्यावे असेही सुप्रिया सुळे म्हणाल्या. तर कुणी फोन केला? कुणामुळे जामीन मिळाला हे देवेंद्र फडणवीसांनी सांगाव, असे म्हणत सुप्रिया सुळे यांनी जोरदार हल्लाबोल केला.

--------------

### माजलगाव धरण मृतसाठ्यात

सध्या मासेमारी करता येत आहे. उर्वरीत कुटूंबीयांना मात्र इतर ठिकाणी रोजगार शोधण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.असे चित्र आहे. त्यामुळे दुष्काळी स्थितीचा फटका हा मासेमारी व्यवसायालाही बसला असल्याने याचाही अर्थचक्रावर परिणाम झाला आहे.

**माशांचे दरही वाढले;खवय्यांनाही झळ**

पाणी कमी झाल्याने मासे कमी निघत आहेत. त्यामुळे वेळ जास्त जात आहे.अशा परिस्थितीत माशांचे दर देखील मोठ्या प्रमाणात वाढले आहेत.एरव्ही शंभर रूपयांत एक किलो मिळणारे मासे १५० ते १८० रूपये प्रतिकिलोने विक्री होत आहेत.त्यामुळे खवय्यांच्या खिशाला कात्री लागत आहे.यात कतला १२० ते १५० रुपये,राहू १२५ ते १५० रुपये, मरळ ३०० ते ४०० रुपये, वामट ४०० ते ५०० रुपये प्रतिकिलो प्रमाणे विक्री होत आहेत.

**अल्प पाण्याचा परिणाम**

माजलगाव धरणात विवीध जातींचे मासे असल्याने बाजारातही त्यांना पसंती आहे.यावर्षी अत्यल्प झालेल्या पावसामुळे धरणात पाणी कमी झाल्याने मासेमारी व्यवसायावर मोठा परिणाम झाला आहे. त्यामुळे मासेमारी करणाऱ्या कुटूंबीयांना इतरत्र रोजगार शोधावा लागत आहे.असे महाराष्ट्र मत्स्यबीज केंद्राचे संचालक शेख मुख्तार म्हणाले.

-----------

### गेल्या १० वर्षापासून

लोकांची अपेक्षा होती की अण्णा हजारे यांनी आंदोलन करावे. पण गेल्या दहा वर्षात त्यांचा एकही शब्द आपण ऐकला नाही. लोकांना अण्णांकडून अपेक्षा असताना ते शांत का?, असा सवाल रोहित पवार यांनी उपस्थित केला आहे. रोहित पवार यांनी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्यावर जोरदार टीका केली आहे. रोहित पवार म्हणाले, एका बाजूला ते स्वतःला नवीन काळचा गांधी समजतात आणि दुसरीकडे भाजपच्या कार्यकाळात सोयीचे आंदोलन करतात. त्यामुळे त्यांनी एक प्रकारे मुखवटा घातलाय, असेच आपल्याला म्हणावे लागेल, असे म्हणत रोहित पवारांनी अण्णा हजारे यांच्यावर टीका केली आहे. अण्णा हजारे यांनी शरद पवारांच्या टीकेला उत्तर देताना त्यांना १२ वर्षांनंतर जाग कशी आली? माझ्या आंदोलनांमुळे यांचे मंत्री घरी गेल्याचा त्यांना राग असावा, असे अण्णा हजारे म्हणाले. त्यावर प्रत्युत्तर देतांना रोहित पवारांनी टीका केली आहे.

----------------

### बारामतीत दोन

सोडविण्याचा धडाका लावला आहे तर दुसरीकडे आज गुरुवारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे धाकटे पुत्र जय पवार यांनीही राष्ट्रवादी भवनात जनता दरबार घेत युगेंद्र यांना प्रत्युत्तर दिले आहे. त्यामुळे आता चुलत्या पुतण्यांच्या राजकीय धूलवडीनंतर या दोन चुलत भावांच्या जनता दरबाराची बारामतीत जोरदार चर्चा सुरू आहे. अजितदादांवर थेट टीका करणारे युगेंद्र पवार बारामतीत जनता दरबार घेत राजकारणात सक्रिय झाले झाल्याने ते विधानसभा निवडणूक लढणार का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. मी याबाबत विचार केला नाही. मला लोकांची कामे करायची आहेत, अजून मला वेळ आहे, असे म्हणत युगेंद्र पवार यांनी उत्तर देणे टाळले होते. मात्र, आता थेट जनता दरबार भरवल्याने आता युगेंद्र पवार सुप्रिया सुळेंची बाजू भक्कमपणे मांडत असल्याचे दिसत आहे. दरम्यान, जय पवार लोकसभा निवडणुकीपासून सक्रिय झाले आहेत. बारामती लोकसभेसाठी अजित पवारांची प्रतिष्ठा पणाला लागली असताना जय पवार यांनी अचानक अंतरवाली सराटीत मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली होती. अजित पवार यांचे मोठे चिरंजीव पार्थ पवार यांच्यासोबतच छोटे चिरंजीव जय पवारही आता बारामतीत सक्रिय झाले असल्याने आता बारामतीचं शीतयुद्ध कोण जिंकणार? यावर सध्या जोरदार चर्चा होताना दिसते.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार, दि. २४ मे २०२४


## नैसर्गिक आपत्ती किंवा पुरामुळे जीवित व वित्तीय हानी होणार नाही याबाबतची दक्षता घ्यावी - विभागीय आयुक्त मधुकर राजे अर्दड

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

यावर्षी मान्सूनचे लवकर आगमन होणार असल्याचा हवामान खात्याचा अंदाज असून यापुर्वीची काही भागातील अतिवृष्टी व पुरपरिस्थिती लक्षात घेता यावर्षी नैसर्गिक आपत्तीचा सामना करण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवा तसेच नैसर्गिक आपत्ती किंवा पुरामुळे जीवित व वित्तीय हानी होणार नाही याबाबतची दक्षता घ्यावी, असे निर्देश विभागीय आयुक्त मधुकर राजे अर्दड यांनी दिले. छत्रपती संभाजीनगर विभाग मान्सून पूर्व तयारीबाबत आढावा बैठक विभागीय आयुक्त मधुकर राजे अर्दड यांच्या अध्यक्षतेखाली आज विभागीय आयुक्त कार्यालयातील सभागृहात घेण्यात आली. यावेळी परभणीचे जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, जालना जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, बीड जिल्हाधिकारी दिपा मुधोळ-मुंडे, हिंगोली जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर, नांदेड जिल्हाधिकारी अभिजित राऊत, लातूर जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर-घुगे, धाराशिव जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, मनपा आयुक्त, निवासी उपजिल्हाधिकारी तसेच विविध यंत्रणांचे प्रमुख हे संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालय येथून दूरदृष्य प्रणालीव्दारे उपस्थित होते. तर छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, कर्नल ऋषिकेश सुर्यवंशी, जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता विजय घोगरे, उपायुक्त जगदिश मिनीयार, नयना बोंदार्डे, सुरेश वेदमुथा, ॲलीस पोरे, अतिरिक्त आयुक्त रणजित पाटील यांच्यासह प्रादेशिक विभागप्रमुख बैठकीला उपस्थित होते.

# भर उन्हाळ्यात धारूरला पंधरा दिवसाला पाणी

## चार लाख लिटर व तीन लाख लिटर क्षमता असणाऱ्या तीन टाक्यांमधून शहराला पाणीपुरवठा केला जातो; सतत खंडित होणाऱ्या वीज पुरवठामुळे पाणीपुरवठा करण्यास अडचणी -मुख्याधिकारी

**किल्ले धारूर /प्रतिनिधी**

भर उन्हाळ्यात शहरात १५ दिवसाआड पाणी पुरवठा होत आहे पाणी साठवणूक जास्त प्रमाणात नसल्यामुळे ३-४ दिवसात पाणी संपून जाते त्यामुळे दैनंदिन कामे सोडून पाण्यासाठी भटकंती करावी लागते.विहीर बोर आठल्यामुळे पाण्याचे दर देखील गगणाला भिडले आहेत रोज रोज पाण्यासाठी ३००-४०० रुपये खर्च करणे परवडत नाही.

लहान मुलापासून ते वयोव्रद्धा पर्येंत सगळेच पाण्यासाठी भर उन्हा-तहाणात जीवाची परवा न करता एका घागरी साठी दिवसभर फिरत असतात. पाण्या वाचून शहरातील नागरिकांचे मोठे हाल आहेत . नागरिकांना पिण्यासाठी पाणी मिळत नसल्याने नागरिकांमध्ये नगर परिषदेविषयी मोठ्या प्रमाणावर रोष व्यक्त केला जात आहे धारूर शहरातील नागरिकांच्या पाण्याच्या समस्या विषई नगरपरिषद गांभीर्याने घेत नसल्याचे शहरातील नगिरक बोलतात.

धारूर तालुका दुष्काळग्रस्त तालुका म्हणून जिल्ह्यामध्ये ओळखला जातो तालुक्यातील ग्रामीण भागासह शहरातील पाण्याची समस्या बिकट झाली आहे धारूर शहरातील नागरिकांना धनेगाव येथील मांजरा धरणावरून पाणीपुरवठा केला जातो धनेगाव पाणीपुरवठा योजना ही जुनी झाल्यामुळे सतत पाईपलाईन बिघाड होत असतो त्यामुळे धारूरकरांना सुरळीत पाणीपुरवठा होत नाही पाण्यासाठी शहरातील नागरिकांना खाजगी टँकर










वर अवलंबून राहावे लागते तसेच पाण्यासाठी महिलांना दूर अंतरावरून पाणी आणून तहान भागवावी लागत आहे शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी नगरपरिषदेच्या वतीने कुंडलिका पाणीपुरवठा योजना मागील दहा वर्षांपूर्वी मंजूर झाली होती परंतु या योजनेचा बोजावरा उडाल्यामुळे मागील अनेक दिवसापासून पाईपलाईनचे काम पूर्ण झालेले नाही त्यामुळे ही योजना देखील धारूरकरांच्या काहीच उपयोगाची नसल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे

तीस वर्ष जुनी धनेगाव पाणीपुरवठा योजना कुचकामी

शहरातील नागरिकांची पाण्याची तहाना भागवण्यासाठी मागील ३० वर्षांपूर्वी धनेगाव येथील मांजरा धरणावरून पाईपलाईन केली होती ही पाईपलाईन आता जुनी झाल्याने शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी सक्षम राहिलेली नाही सतत बिघाड होत असल्यामुळे नगरपरिषदेला शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. शहरातील नागरिकांना पाण्यासाठी या पाईपलाईनच्या दुरुस्तीसाठी नगरपरिषदेच्या आणि पुरवठा विभागाकडून खर्च करूनही काही उपयोग होत नाही त्यामुळे शहराला सुरळीत पाणीपुरवठा होत नाही. धनेगाव येथील पाणी उपसा करणार विद्युत पंपाला सुरळीत वीजपुरवठा न मिळाल्यामुळे धरणातील पाणी उपसा करण्यात अडचणी येतात नगरपरिषदेचे आठ ते दहा कर्मचारी पाणीपुरवठा करण्यासाठी धनेगाव पाईपलाईन वर कार्यरत आहेत परंतु सततच्या होणाऱ्या बिघाडामुळे कर्मचारी हतबल होतात.

### मांजरा धरणाच्या पाणीपातळीने तळ गाठला

धनेगाव तालुका केज येथील मांजरा धरणाची पाणी साठवण क्षमता २२४.०९ दशलक्ष घनमीटर एवढी आहे सध्या या धरणाची पाणी क्षमता शून्य पातळीकडे. मांजरा धरणातून लातूर शहर लातूर एमआयडीसी आंबेजोगाई केज व धारूर शहराला पाणीपुरवठा केला जातो एकाच धरणावर अवलंबून आहेत पुरेसा पाऊस न झाल्यास भविष्यात धारूर शहराला कितपत पाणीपुरवठा करणे शक्य होईल हे सांगता येत नाही.

### खाजगी टँकर चालकांकडून आर्थिक लूट

नगरपरिषदे कडून शहराला पंधरा दिवसाला एकदा पाणी मिळते त्यामुळे इतर दिवसांमध्ये शहरातील नागरिकांना खाजगी टँकरवर वजन कडून दोनशे रुपयांमध्ये पाचशे लिटर पाणी विकत घ्यावे लागते. त्यामुळे नागरिकांना आर्थिक भुरुदंड सोसावा लागत आहे त्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड रोष दिसत आहे.

शहरातील ज्या भागांमध्ये पाईपलाईन नाही अशा भागात टँकर मंजूर करण्यात आले आहेत लवकरच त्या भागात टँकरद्वारे पाणी पुरवले जाणार तसेच शहराच्या जवळ असणाऱ्या साठवण तलावावरून पाईपलाईनचे काम ५०% च्या आसपास पूर्ण झाले आहे योजना लवकरात लवकर कार्यान्वित केली जाईल बंद पडलेली कुंडलिका पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव शासनाकडे मार्गदर्शनासाठी पाठवला आहे. ही योजना देखील कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

-महेश गायकवाड, मुख्याधिकारी नगरपरिषद धारूर.

दारात पाण्याचा नळ असून देखील काहीच उपयोग नाही त्या नळाला पंधरा दिवसाला एकदा पाणी येते मिळणारे पाणी काटकसरीने वापरले तरी तीनच दिवस पुरते बाकीच्या दिवसात खाजगी टँकर चे विकत घेणे शक्य नसल्याने घरापासून लांब अंतरावरून डोक्यावर पाणी आणावे लागते.

जनक फुन्ने, नागरिक धारूर

## वसंतराव नाईक कनिष्ठ महाविद्यालय नाईकनगर गेवराई या कनिष्ठ महाविद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा

**गेवराई । प्रतिनिधी**

सुशिल शिक्षण संस्था बीड संचलित प्राथमिक,माध्यमिक आश्रमशाळा व वसंतराव नाईक कनिष्ठ महाविद्यालय नाईकनगर गेवराई या कनिष्ठ महाविद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवत यावर्षी एच.एस.सी निकाल ९६.७० टक्के लागला आहे.

नुकताच १२ वी वर्गाचा ऑनलाईन निकाल जाहीर झाला असून सुशिल शिक्षण संस्था बीड संचलित प्राथमिक,माध्यमिक आश्रमशाळा व वसंतराव नाईक कनिष्ठ महाविद्यालय नाईकनगर गेवराई या कनिष्ठ महाविद्यालचा विज्ञान व कला शाखेचा निकाल लागला असून विज्ञान शाखेचा ९८.०३ टक्के तर कला शाखेचा ९५ टक्के निकाल लागला आहे. विज्ञान शाखेत परीक्षेत एकूण ५१ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते यामधील उत्तीर्ण विद्यार्थी ५०, विशेष प्राविण्यासह ०४ विद्यार्थी, प्रथम श्रेणीमध्ये ३६ तसेच द्वितीय श्रेणीमध्ये १० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून प्रथम क्रमांक गायकवाड उदयसिंह अविनाश ८२.६७ टक्के गुण मिळविले तर द्वितीय क्रमांक पालवे अभय विजय ७९.५० टक्के, तृतीय क्रमांक चव्हाण चंद्रकांत सुभाष ७६.३३ टक्के गुण मिळवून यशस्वी झाले आहेत. तसेच कला शाखेचा निकाल ९५ टक्के लागला असून कला शाखा परीक्षेस बसलेले विद्यार्थी ४० उत्तीर्ण विद्यार्थी ३८ विशेष प्राविण्यासह प्रथम श्रेणीमध्ये ०१, प्रथम श्रेणीध्ये ३१, द्वितीय श्रेणीत ०६ असे एकुण ३८ विद्यार्थी उत्तीर्ण झालेयामध्ये प्रथम क्रमांक चव्हाण पुजा गुलाबराव ७६.१७ टक्के, द्वितीय क्रमांक राठोड वनिता नवनाथ ७४.६७ टक्के तर तृतीय क्रमांक राठोड करण शिवाजी ७२.८३ टक्के गुण मिळवून यश संपादन केले आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष सुशील भाऊ पवार, सचिव आदरणीय दिनेश लालाजी पवार, आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य पवार आर.डी. तसेच प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## श्रीकृष्ण -सुदामाची मैत्री जगात आदर्शवत -भागवताचार्य सचिन महाराज सपकाळ

**बीड । प्रतिनिधी**

मौजे लोळदगाव येथील कै. लिंबाजी आश्रुबा घोडके यांच्या चतुर्थ पुण्यस्मरणानिमीत्त आयोजित भव्य दिव्य संगीतमय भागवत कथेची सांगता आनंदाच्या व भक्तीमय वातावरणात संपन्न झाली.

कथेच्या सांगतेला भागवताचार्य सचिनजी महाराज सपकाळ यांनी भगवान श्रीकृष्ण यांचे निस्वार्थ मित्र भक्त सुदामाचे चरित्र सांगताना गरीब सुदामाची दयनीय अवस्था असताना देखील त्यांनी श्रीकृष्णाची भक्ती सोडली नाही तसेच परम सखा श्रीकृष्णाची भेट झाली तरीही आपल्या गरीब परिस्थितीचे कसलेही कथन केले नाही, पत्नी -मुले उपाशी आहेत हे देखील सांगितले नाही. त्यामुळे श्रीकृष्णाने सुदामाचे पोहे खात सुदामाला ऐश्वर्य प्रदान केले.




श्रीकृष्ण सखा सुदामाने गरीबी- आली तरी मित्र प्रेम व भक्ती सोडली नाही तर श्रीकृष्ण भगवान राजा व ऐश्वर्य संपन्न असताना देखील ते आपला गरीब मित्र सुदामाला विसरले नाहीत व भेट होताच त्यांनी आपल्या गरीब मित्राला श्रीमंती देऊन मदत केली म्हणूनच श्रीकृष्ण सुदामाची मैत्री जगात आदर्शवत आहे. हा प्रसंग विशद करताना उपस्थित भाविक गहिवरले सचिन महाराजांनी आपल्या अमृततुल्य मधुर रसाळ वाणीतून भागवत कथा सांगताना भाविकांना मंत्रमुग्ध केले.

या भागवत कथेस सिंथ सम्राट तथा सुरशिरोमनी वसुदेव महाराज काजळे, मातोश्री कुसुमताई सपकाळ-गायन, सुनिल महाराज घोडके-ॲटोपॅड, मनोज महाराज बोटे-गायन, नेवाळे महाराज-गायन, पवन महाराज सपकाळ- गायन, यजमान संकेत महाराज घोडके -तबला यांची सुंदर संगीत साथ लाभली. तसेच ह.भ.प. कचरू महाराज बुरांडे यांनी नेत्रदीपक झाकी प्रदर्शन करून भाविकांना मोहित केले. भागवत कथेच्या समाप्ती नंतर यजमान वैभव घोडके यांनी भागवताचार्य सचिन महाराज सपकाळ यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला. पुढे असंख्य ग्रामस्थांनी महाप्रसादाचा लाभ घेतल्यानंतर भव्य ग्रंथ मिरवणूक काढण्यात आली. ही भागवत कथा व ग्रंथ मिरवणूक यशस्वी करण्यासाठी यजमान संकेत महाराज घोडके, वैभव घोडके व संपूर्ण घोडके परीवार यांनी अथक परिश्रम घेतले.

## प्रा. शेंडगे आणि प्रा. जाधव यांच्या संशोधनाला यश आंतरराष्ट्रीय पातळीच्या उपकरणाला भारत सरकारची मान्यता प्राप्त

**माजलगाव । प्रतिनिधी**

फार्मसी क्षेत्रात अत्यंत गरजेचे मानले जाणारे 'टॅबलेट डिझोलुशन ॲपरेटस' हे उपकरण औषधी गोळ्या आणि कॅप्सुल यांची गुणवत्ता तपासण्यासाठी प्रत्येक देशातील औषधी कंपनी, औषधे सबंधित सरकारी नियमाक संस्था वापरते. या उपकरणामध्ये केलेल्या तपासणीच्या आधारे फार्मास्युटिकल कंपनीने तयार केलेल्या टॅबलेट (गोळ्या) आणि कॅप्सुल मार्केट मध्ये विकण्यासाठी योग्य आहेत की नाही हे ठरवले जाते. या अत्यंत महत्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या उपकरणात नावीन्य पूर्ण बदल करत त्यात अत्यंत सोप्या आणि सुलभ पद्धतीने हाताळता येणारे अधिकचे पण गरजेचे पॅरामिटरस



ॲड करून एक नवीन उपकरण (यंत्र) प्रा. शेंडगे आणि प्रा. जाधव यांनी बनवले आहे.

गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी मधील प्राध्यापकांनी तयार केलेल्या या उपकरणात खास करून संवेदनशील वेळ दर्शक प्रमाण ॲड केले आहे जे की आत्तापर्यंत या उपकरणात उपलब्ध नव्हते. प्रयोग करत्यांना टॅबलेट डिझोलुशन चाचणी करताना या क्रियेचा वेळ तपासण्यासाठी घडी, स्टॉपवाच या सारख्या दुसऱ्या उपकरणाची मदत घ्यावी लागत असे त्यामुळे अनेकदा तपासणी चुकत असे. प्रा. शेंडगे आणि प्रा. जाधव यांनी तयार केलेल्या यंत्रात अचूक वेळ, तापमान, पी एच या गोष्टी दिसणार आहेत. प्राध्यापक ऋषीकेश शिवाजीराव शेंडगे हे फार्मासुटिक्स विषयाचे तज्ञ आहेत त्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अतंर्गत 'मास्टर इन फार्मसी' ही पदव्युत्तर पदवी घेतलेली आहे. तसेच दैनंदिन जीवनात वापरात येणारे वैद्यकीय व औषधनिर्माणशास्त्र निगडित यंत्र व उपकरणे आणि त्यात असलेल्या उणीवा यांवर त्यांचा सखोल अभ्यास आहे. प्रा. शेंडगे यांनी टॅबलेट डिझोलुशन ॲपरेटस यातील कमतरता शोधल्या व प्रा. जाधव यांच्या सोबत मिळून यंत्रात सुधारणा करण्याचे काम केले. या संशोधनात त्यांची को-ऑथर (उपप्रमुख) ही भूमिका आहे.

## महाराष्ट्रात येणारा ५० हजार कोटींचा उद्योग राज्याबाहेर गेला; विरोधकांकडून टीका

**मुंबई । प्रतिनिधी**

गॅस अथॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेड म्हणजेच 'गेल' कंपनीकडून मध्य प्रदेशमध्ये ५० हजार कोटींचा प्रकल्प उभारण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील संभाजीनगर किंवा दाभोळ येथे होणारा हा प्रकल्प आता मध्यप्रदेशच्या सिहोर येथे उभारला जाणार आहे. विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी याघटनेवरून सत्ताधाऱ्यांना लक्ष्य केले आहे. महाराष्ट्राच्या वाट्याला येणारा उद्योग असा सहज बाहेर कसा गेला? याचे उत्तर उद्योगमंत्र्यांनी द्यावे, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.




इकॉनॉमिक टाइम्सने दिलेल्या बातमीनुसार, ही गुंतवणूक सरकारी गॅस प्रकल्पातील आतापर्यंतची सर्वात मोठी गुंतवणूक आहे. गेलकडून मध्य प्रदेशच्या सिहोरमध्ये उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पात प्रति वर्षी १.५ दशलक्ष टन इथेन क्रॅकिंग करण्यात येणार आहे. देशातील पेट्रोकेमिकल्सची मागणी पूर्ण करण्यासाठी या नवीन प्रकल्पाची मदत होणार असल्याचे सांगितले जात आहे.

इथेन हा नैसर्गिक वायूचा एक प्रकार असून त्याच्यापासून इथिलिन तयार करण्यात येते. प्लास्टिक, सिंथेटीक रबर आणि इतर पेट्रोकेमिकल्स तयार केले जातात.

प्रकल्प राज्याबाहेर कसा गेला?

सध्या भारतात रिलायन्स इंडस्ट्रीजचे दोन इथेन क्रॅकिंग प्रकल्प आहेत. एक प्रकल्प गुजरातच्या हाजिरा येथे तर दुसरा महाराष्ट्रातील नागोठणे येथे आहे. गेलकडून सध्या मध्यप्रदेशमध्ये थाटला जाणार प्रकल्प महाराष्ट्राच्या छत्रपती संभाजीनगर किंवा दाभोळ येथे होणार होता. मात्र नंतर हा प्रकल्प मध्यप्रदेशमध्ये थाटण्याचा निर्णय झाला.

भारत पेट्रोलियम कॉर्पचाही ६ अब्ज डॉलरचा इथेन-फेड क्रॅकर प्रकल्प मध्य प्रदेशच्या बिना रिफायनरी येथे हलविण्यात आला आहे.

इथेन अधिक असलेल्या देशांमधून आपल्याकडे आयात केले जाईल, असे गेलने फेब्रुवारी महिन्यात जाहीर केले होते. मार्च महिन्यात गेलने ओएनजीसी आणि शेल एनर्जी इंडिया यांच्याबरोबर इथेन व इतर हायड्रोकार्बन्स आयात करण्यासाठी सामंजस्य करार केला. सुरुवातीला हा प्रकल्प महाराष्ट्रात होण्याची चर्चा असताना आता अचानक मध्य प्रदेशमध्ये गुंतवणूक होणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

**जाहीर प्रगटन**

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१४७/२०२४

गायके श्रीकृष्ण बबन विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय सौंदाना ता.जि.बीड

पहा

१. गायके श्रीकृष्ण बबन रा.सौंदाना ता.जि.बीड.

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत दाजी सुर्यभान गायडे यांचा दिनांक २२/०६/१९२० रोजी मृत्यू झालेला असुन त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास सौंदाना ता.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे ता. जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २२/५/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख २४/६/२०२४ ही आहे.

| | |
|---|---|
| **मार्फत** | **स्वाक्षरित/-** |
| **ॲड.मिलींद उबाळे** | **तहसिलदार, बीड** |

## भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने गौतम बुद्ध जयंती साजरी

**माजलगाव । प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा माजलगाव यांच्या वतीनं दिनांक २३मे २०२४ वार गुरुवार रोजी सांची बुद्ध विहार डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन येथे अहिंसा आणि शांतीचे प्रतिक तथागत भगवान गौतम बुद्ध यांची २५६८ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. त्या प्रसंगी सकाळी नऊ वाजता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक पासुन सांची बुद्ध विहार आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प पर्यंत गौतम बुद्धांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली त्या नंतर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते म्हणुन भारतीय बौद्ध महासभा जिल्हा संस्कार सचिव आद प्रा डॉ आर डी आचार्य हे होते या प्रसंगी बोलताना ते म्हणाले कि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी गौतम बुद्धांची ओळख अखिल मानव जातीला घालुन दिली डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेण्या अगोदर म्हणजे



१९५० साली दिल्ली येथे २०००० अनुयायांना सोबत घेवून भगवान गौतम बुद्धाची पहिली जयंती भारतात साजरी केली. तसेच १९५३ साली मुंबईत बुद्ध जयंती साजरी केली तेंव्हा महाराष्ट्रातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना मानणारा वर्ग खेड्यापाड्यातून जयंतीला आला होता अन्? १९५६ साली बौद्ध धम्माचा स्वीकार केला. तेंव्हा पासून बौद्ध समाज बांधव बुद्ध जयंती साजरी करतात.आता भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभरामध्ये भगवान गौतम बुद्ध यांची जयंती साजरी करतात.असे प्रतिपादन प्रा डॉ आर डी आचार्य यांनी केले तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष गुलाबराव धाईजे हे होते तर या ठीकाणी भारतीय बौद्ध महासभेच्या,महिला जिल्हा सरचिटणीस शोभाताई भोजने,जिल्हा संस्कार उपाध्यक्ष एस बी मोरे,जिल्हा संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे,जिल्हा पर्यटन सचिव एन बी राजभोज,जिल्हा संघटक बी सी डोंगरे, पत्रकार अमर साळवे,सेलापुरीच्या उपसरपंच शुशिलाताई घडसे, बहुजन समाज पार्टी चे, अभिमन्यु साळवे, हरिभाऊ साळवे ,कार्तीसुर्य सेवा भावी संस्थेचे अध्यक्ष अशोक मगर,दिनेश निसर्गंध संतकबीर मल्टीस्टेटचे रवि टाकणखार हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक आशाताई मोरे यांनी केले तर आभार डॉ भागवत साळवे यांनी मानले व सिद्धार्थ वक्ते यांनी सुत्रसंचलन केले तर याप्रसंगी मान्यवरांनी मार्गदर्शन केले तसेच या कार्यक्रमासाठी आद.मंदाताई साळवे व शुशिलाताई घडसे यांनी भोजन दान देण्यात आले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डी एस साळवे,बाबासाहेब घनघाव ,दयानंद साळवे,डी पी वाघमारे,संभाजी धाईजे,विशाखाताई वाघमारे,मंदाताई साळवे,विशाल साळवे, अम्रपाली साळवे,किरण साळवे,प्रकाश साळवे,भानूदास साळवे , मोहन काकडे,भगवान डोंगरे ,नितिन डोंगरे, कुशीवर्ता साळवे, शांताबाई साळवे,मंडोधरी खंदारे,मायाताई स्वामी,रेखाताई भारस्कर, प्रसेनजीत शिंदे,,वैभव साळवे,कुसुमताई काकडे यांच्या सह भारतीय बौद्ध महासभा पदाधीकारी यांनीहभारतीय बौद्ध महासभा शाखा माजलगाव च्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## पान ६ वरून...

### जरांगे पाटील यांच्या सुरक्षा

निर्माण झाला आहे. त्यामुळे आपणास अखंड मराठा समाज बीड जिल्ह्याच्या वतीने बीड जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे आपणास विनंती करण्यात येते की, आपण राज्य शासनाला पत्रव्यवहार करून त्यांच्या सुरक्षा व्यवस्था मध्ये वाढ करावी व सोशल मीडियावरून त्यांना धमक्या देणाऱ्यांवर तत्काळ कार्यवाही करावी अशी मागणी माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे, स्वानील गरधर, हनुमान मुळीक, ज्ञानेश्वर गंगाधर, संजय जाधव, विकास देरेकर यासह सकल मराठा बांधवांच्या वतीने करण्यात येत आहे.

### वीज खंडित होत असल्याने परळीकर

शहरातील विद्युत कार्यालयात नागरिकांचे आलेले फोने उचलावेत तसेच फोन न उचलणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी.

विद्युत विभागाच्या वतीने नागरिकांना वेठीस धरण्याचे काम केले जात आहे त्याचा निषेध म्हणून सामाजिक कार्यकर्ते एडवोकेट मनोज संकाये मित्र मंडळाच्या वतीने जुने पावर हाऊस कार्यालयात लाईट बंद करून मेणबत्ती पेटवून आंदोलन करण्यात येणार आहे. अन्यथा लवकरच शहरातील वीज पुरवठा सुरळीत करा अन्यथा तीव्र आंदोलन केले जाईल अशा ईशारा सामाजिक कार्यकर्ते मनोज संकाये यांनी दिला.

# अस्मानी संकटानंतर खतांचाही तुटवडा

## डीएपी सारखी रासायनिक खते मिळणेही होणार कठीण



वाशिम : खरीप हंगाम तोंडावर आला कि शेतकरी पेरणीच्या तयारीला लागत असतात. मात्र, पेरणीपूर्वी शेतकरी आपल्या शेतात पिकाच्या वाढीसाठी डीएपी सारखी रासायनिक खते वापरत असतात. असे असताना आता शेतकऱ्यांना ही रासायनिक खते मिळणार नसल्याचे चित्र आहे. कारण रासायनिक खते निर्मिती करणाऱ्या कंपन्यानी डीएपी खते निर्मिती जवळपास बंद केल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे डीएपी सारखी खते कमी किमतीत देणे शक्य नसल्याचे खत विक्रेते आणि व्यापाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे येत्या हंगामात डीएपी सारखी रासायनिक खते मिळण्याची शक्यता जवळ जवळ मावळली आहे. तर शेतकऱ्यांनी डीएपी खताला पर्याय म्हणून इतर खते वापरून आपली गरज भागवावी, अस आवाहन देखील करण्यात आले आहे.

डीएपी खते मिळणे होणारा कठीण

सध्या देशातील सरकारी धोरण आणि हमास, इजराईल येथे युद्धजन्य परिस्थितीत होणाऱ्या सततच्या हल्ल्यामुळे रासायनिक खताच्या निर्मितीसाठी लागणरे साहित्य गरजे नुसार मिळत नाहीये, तसेच जे मिळत आहे त्यांचे दर जास्त असल्याने ते खरेदी करणे शक्य नसल्याचे खत व्यापाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे. दुसरीकडे शासनाकडून मिळणाऱ्या सवलती देखील तुटपुंजी असल्याने अशा खतांची निर्मिती करणे शेतकऱ्यांसह व्यापाऱ्यांनाही परवडणारे नाही. त्यामुळे या हंगामात शेतकऱ्यांना डी ए पी सारखी रासायनिक खते मिळणार नसल्याचे मत रासायनिक खताचे होलसेल विक्रेते नितीन पाटणी यांनी बोलतांना व्यक्त केले आहे.

तेंदूपत्ता माफीयांचा वनविभागाला लाखोचा चुना : वाशिम जिल्हा हद्दीतील तेंदूपत्ता पळवून तो अकोला वन परिक्षेत्रातील असल्याचे दाखवून वनविभागाचा लाखो रुपयाचा महसूल बुडवण्याचा प्रयत्न होत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. वाशिमच्या मालेगाव तालुक्यातील धरमवाडी, माळेगाव,परिसारत हा धक्कादायक प्रकार घडत असल्याचे बघायला मिळाले आहे. तेंदूपत्ता माफियाकडून मोठ्या प्रमाणात अशा पद्धतीने तेंदूपत्ता तस्करी होत असून वाशिम वनविभाग याकडे मुद्दाम दुर्लक्ष करत आहे का, असा प्रश्न या निमत्याने निर्माण झाला आहे.

कारवाई करत तेंदुपत्ता जप्त करण्याची मागणी

तेंदूपत्याचे कंत्राट घेणाऱ्या कंत्राटदार काही गुंड प्रवृत्तीच्या लोकांना हाताशी घेऊन परिसरातील नागरिकांना घाबरवण्याचा प्रयत्न करत आहे. तर तेंदूपत्ता ठेवल्या जाणाऱ्या डेपो (फड) हा सरकारी नियमाने हर्रास झालेल्या त्या परिक्षेत्राच्या तीन किलोमीटर अंतरात ठेवावा लागतो. मात्र, अस न करता वाशिम जिल्हा हद्दीत वन विभागाच्या हद्दीत ठेवून वन अधिकारी यांना हाताशी धरून मोठ्या प्रमाणात तेंदूपत्याची अफरातफर केली जात असल्याचे बोलल्या जात आहे. मात्र, वाशिम वनविभाग याकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष करत असल्याचा आरोप स्थानिक करत आहेत. वन विभागाने या प्रकरणी कारवाई करत तेंदुपत्ता जप्त करावा, अशी मागणी स्थानिकांकडून जोर धरू लागली आहे.

## अवकाळीचा दणका, उजनी काठावरील बळीराजाला फटका

### केळीच्या बागा जमीनदोस्त, कोट्यावधी रुपयांचं नुकसान



सोलापूर : राज्याच्या विविध भागात अवकाळी पावसाचा जोर पाहायला मिळत आहे. या अवकाळी पावसाचा शेती पिकांना मोठा फटका बसत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यात उजनी धरणाच्या परीसरात वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळं शेती पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. विशेषत: केळीच्या बागा जमिनदोस्त झाल्या आहेत. यामुळं शेतकऱ्याचं लाखो रुपयांचं नुकसान झालं आहे.

करमाळा तालुक्याला मोठा फटका, १५ ते २० कोटी रुपयांचे नुकसान

सध्या वादळी वारे आणि अवकाळीचा सर्वात जास्त फटका उजनी जलाशयाच्या काठावर असणाऱ्या केळी बागांना बसला आहे. अनेक ठिकाणी बागा जमीनदोस्त झाल्या आहेत. उजनी जलाशयाच्या काठावर असणाऱ्या चिखलठाण परिसरात खूप मोठे नुकसान झाले आहे. येथील विकास राजाराम वाघमोडे यांची चार एकर केळीची बाग जमीनदोस्त झाली आहे. तर शेतकरी नवनाथ कोंडीबा मारकड यांची पाच एकर क्षेत्रावरी केळीची बाग आडवी झाली आहे. तर प्रदीप विठ्ठल हिरवे यांची तीन एकर केळीची बागही आडवी झाली आहे. याशिवाय अभिजीत महादेव हिरवे यांची साडेतीन एकर केळीची बाग जमीनदोस्त झाली आहे. राज्यात केळीचे हब होऊ पाहणाऱ्या करमाळा तालुक्याला मोठा फटका बसला असून अंदाजे १५ ते २० कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे.

देशासह राज्यातील वातावरणात सातत्यानं बदल : सध्या देशासह राज्यातील वातावरणात सातत्यानं बदल होत आहे. कुठं उन्हाचा तडाका जाणवत आहे, तर कुठं अवकाळी पावसाचा जोर पाहायला मिळत आहे. दरम्यान, काही भागात दुपारपर्यंत उन्हाचा जोर पाहायला मिळत आहे. तर दुपारनंतर वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस कोसलथ असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. दरम्यान, हवामान अभ्यासकांनी दिलेल्या माहातीनुसार राज्यातील काही भागात अवकाळी पावसाची शक्ता पुढील काही दिवसात कायम आहे. त्यामुळं पुन्हा अवकाळी पाऊस कोसळणार आहे. हवामान अभ्यासकांच्या अंदाजानुसार २५ मे पर्यंत राज्यात अवकाळी पावसाचा जोर कायम राहणार आहे. या अवकाळी पावसाच्या वेळी वादळी वारे देखील वाहण्याचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळं या पावसाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी योग्य ती काळजी घ्यावी असं आवाहन प्रशासनाच्या वतीनं करण्यात आलं आहे. तर काही भागात उष्णतेच्या लाटेचा इशाराही देण्यात आलाय.

## बीटल शेळी बंदिस्त शेळीपालनासाठी उत्तम पर्याय

शेळी पालन हा शेतीपूरक व्यवसाय असून, कमी भांडवल व कमी जागेत हा व्यवसाय करता येण्यासारखा आहे. ज्यामुळे सध्या अनेक शेतीला पूरक व्यवसाय म्हणून शेळीपालन करताना दिसून येत आहे. शेळयांना इतर जनावरांपेक्षा जसे की गाय, म्हैस यांपेक्षा खूप कमी प्रमाणात खाद्य लागते. साधारणत: एका गाईला लागणाऱ्या खाद्यामध्ये १० शेळ्या पाळल्या जाऊ शकतात. त्यामुळे अल्प भू धारकांसाठी हा व्यवसाय अतिशय फायदेशीर आहे. त्यामुळे आता शेळीपालन करण्याचा विचार करत असाल तर शेळीची योग्य जात निवडणे खूप आवश्यक असते. याच पार्श्वभूमीवर 'बीटल शेळी' या शेळीच्या प्रजातीबद्दल माहिती जाणून घेणे आवश्यक ठरते.



बीटल शेळी ही भारतातील पंजाब प्रांतातील एक जात आहे. शेजारील देश असलेल्या पाकिस्तानमध्ये दूध आणि मांस उत्पादनासाठी या प्रजातीची शेळी पाळली जाते. शेळीची जात जमनापारी शेळी आणि मलबारी शेळी यांसारखी असते. या शेळीला 'लाहोरी बकरी' असेही म्हणतात. मोठ्या शरीराच्या आकारासह ते चांगले दूध काढणारे मानले जाते. कान सपाट लांब कुरळे आणि झुकलेले असतात. या शेळ्यांची कातडी उच्च दर्जाची मानली जाते. संपूर्ण भारतीय उपखंडात स्थानिक शेळ्यांच्या सुधारणेसाठी बीटल शेळ्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. या शेळ्या स्टॉल फीडिंगसाठी देखील अनुकूल आहेत, त्यामुळे सघन शेळीपालनासाठी प्राधान्य दिले जाते.

बीटल शेळीची वैशिष्ट्ये? : या शेळीचे मुळस्थान पंजाबमधील गुरुदास हे आहे. ही शेळी दुधासाठी चांगली मानली जाते. या शेळ्या आकाराने मोठ्या असतात. यांचा रंग काळा असून अंगावर पांढऱ्या रंगाचे डाग असतात. कान लांब लटकलेले असतात आणि आत वाकलेले असतात. मादीचे वजन ४० ते ५० किलो व नराचे वजन ५० ते ८० किलो असते. एका वेतातील दूध उत्पादन ५ ते ७ लिटरपर्यंत जाते. ही शेळी बंदिस्त पद्धतीसाठी योग्य आहे.

कोणत्या जातीच्या शेळया पाळाव्यात? : राज्यासह देशभरात शेळ्यांच्या अनेक वेगवेगळ्या जाती वेगवेगळ्या हवामानात व प्रदेशात आहेत. साधारणपणे, गवताळ प्रदेशातील शेळ्या मोठ्या आकाराच्या व वजनाच्या असतात. आपल्या देशाचा विचार करता देशाच्या भौतिक रनचेनुसार वेगवेगळ्या ठिकाणी विषम हवामान आढळते. हवामानानुसार त्या भागात वेगळे अस्तित्व असणाऱ्या जातीची जडणघडण झाली आहे.

## खरिपात मका लागवड जास्त फायदेशीर ; भाताच्या तुलनेत मिळतोय जास्त नफा

पुणे : देशात रब्बी पिकांचा हंगाम संपला आहे. शेतकऱ्यांनी आता खरीप हंगामाची तयारी सुरू केली आहे. खरीप हंगामात अनेक पिके घेतली जात असली तरी. परंतु, देशाच्या बहुतांश भागात भात किंवा मक्याची लागवड केली जाते. मात्र, शेतकरी अनेकदा संभ्रमात पडतात की मका पिकवायचा की भात? जर आपण भाताबद्दल बोललो तर ते खरीप हंगामातील मुख्य पीक आहे. देशात धानाची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. मात्र धानापेक्षा मका शेती ही शेतकऱ्यांना जास्त फायदेशीर आहे. धानाच्या तुलनेत मका लागवडीत शेतकऱ्यांना दुप्पट नफा मिळू शकतो.



देशात वर्षभर मक्याची लागवड केली जाते. पाणी उपलब्ध असताना विविध भागातील शेतकरी वर्षभर शेती करतात. परंतु हे प्रामुख्याने खरीप पीक मानले जाते. खरीप हंगामात याची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. विशेषतः ज्या राज्यांमध्ये शेतकरी पावसावर आधारित सिंचनावर अवलंबून आहेत. त्या राज्यांमध्ये शेतकरी पावसाळ्यात वरच्या जमिनीवर मका पिकवतात आणि त्याच्या लागवडीतून चांगले उत्पादन मिळते. मक्याचा भावही चांगला असेल तर त्याची विक्री करून शेतकऱ्यांना चांगला नफा मिळतो. विशेषत: मक्यावर प्रक्रिया केल्यानंतर त्यापासून अनेक उत्पादने तयार केली जातात. त्यामुळे त्याला बाजारपेठेत मोठी मागणी आहे. खरिपातच जास्त मका का घेतला जातो. त्यामागील कारण काय आणि त्यातून शेतकऱ्यांना काय फायदा होतो? हे जाणून घेणे अत्यंत आवश्यक आहे. खरेतर खरीप हंगामात मका लागवड केल्याने हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पीक चक्र सुधारण्यास मदत होते आणि शेतकऱ्यांना अधिक नफाही मिळतो. कमी पावसातही तयार होणारे आणि चांगले उत्पादन देणारे हे पीक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना याचा लाभ मिळतो. भातशेतीत उत्पादन थोडे कमी झाले तर भार पडतो. भातशेतीपेक्षा मक्याच्या शेतीतून जास्त उत्पन्न मिळते.

कमी कालावधी : मक्याचे वाढीचे चक्र भातापेक्षा कमी असते. यामुळे शेतकऱ्यांना त्यांची पिके लवकर कापणी आणि विकण्याची सोय होते. उच्च उत्पादन क्षमता : खरीप मक्याचे सरासरी उत्पादन ५०-५५ क्विंटल/हेक्टर आहे. तर भाताचे सरासरी उत्पादन ३५-४० क्विंटल/हेक्टर आहे.

कीड व रोगाचा दाब कमी : भातापेक्षा मक्यावर किडीचा प्रादुर्भाव कमी असतो आणि कीड व्यवस्थापनाचा खर्चही कमी असतो.

बाजारातील उच्च मागणी आणि किमती : खरीप मका सामान्यतः रब्बी मक्यापूर्वी काढला जातो आणि पुरवठा तुलनेने कमी असताना बाजारात उपलब्ध होतो. त्यामुळे शेतकऱ्यांना चांगला भाव मिळतो. पीक रोटेशनचे फायदे: खरीप मका हे गहू किंवा कडधान्ये यांसारख्या इतर पिकांसोबत आवर्तनाने पीक घेता येते, जमिनीची सुपीकता सुधारते आणि कीड आणि रोगांचा संचय कमी होतो. विविधीकरणाची संधी: खरीप मका पीक विविधीकरणाची संधी देते, ज्यामुळे एकच पीक (उदा. भात) वाढण्याशी संबंधित जोखीम कमी होते. मका शेतीत नफा : मक्याची लागवड करून शेतकरी हेक्टरी ६८ हजार रुपयांपर्यंत निव्वळ उत्पन्न मिळवू शकतात. तर भातशेती करून शेतकऱ्यांना केवळ ३५ हजार रुपये प्रति हेक्टर निव्वळ नफा मिळू शकतो. त्यामुळे या बातमीत आम्ही तुम्हाला खरीप हंगामात मका पिकवणे अधिक फायदेशीर का आहे हे सांगणार आहोत. अधिकाधिक शेतकरी शेती करून चांगला नफा मिळवू शकतात आणि त्यांचे उत्पन्न वाढवू शकतात.

खरिपातील मका लागवडीचे फायदे : पाण्याची कमी गरज : मका पिकाला खूप कमी पाणी लागते. एकीकडे मका पिकवण्यासाठी ६२७-६२८ मिमी/हेक्टर पाणी लागते, तर भात पिकवण्यासाठी सरासरी १०००-१२०० मिमी/हेक्टर पाण्याची गरज असते.




### जागतिक दिवस

राष्ट्रकुल दिन
जागतिक स्किझोफ्रेनिया जागरूकता दिन

### महत्वाच्या घटना

१६२६ : पीटर मिन्युईटने स्थानिक लोकांकडून मॅनहटन बेट २४ डॉलरला विकत घेतले.
१६५३ : साली जर्मन देशाच्या संसदेने फर्डिनेंड द्वितीय यांना ऑस्ट्रिया देशाचे राजा म्हणून घोषित केलं.
१८३० : अमेरिकेमध्ये पहिल्यांदा प्रवासी रोडरेल सेवा सुरु करण्यात आली.
१८४४ : तारायंत्राचे संशोधक सॅम्युअल मोर्स यांनी स्वत: विकसित केलेल्या सांकेतिक भाषेत पहिला संदेश वॉशिंग्टन येथून बाल्टिमोर येथे पाठवला.
१८७५ : ब्रिटीश कालीन भारतात सर सैय्यद अहमद खान यांनी अलीगढ येथे मुहम्मद एंग्लो ओरिएन्टल शाळेची स्थापणा केली. वर्तमानात त्या शाळेलाच अलिगढ मुस्लीम विश्व विद्यालय म्हणून ओळखले जाते.
१८८३ : न्यूयॉर्क मधील ब्रूकलिन ब्रिज वाहतुकीस खुला झाला.
१९३१ : अमेरिकेतील वाल्टमोर ओहियो या रेल्वे मार्गावर पहिली वातानुकुलीत प्रवासी रेल्वे सुरु करण्यात आली.
१९४० : इगोर सिकोरसकी यांनी एका-रोटर हेलिकॉप्टर चे यशस्वी उड्डाण केले.
१९७६ : ध्वनीपेक्षा अधिक वेगाने जाणार्या काँकॉर्ड विमानाची लंडन ते न्यूयॉर्क अशी सेवा सुरू झाली.
१९८६ : इजराईल देशाचा दौरा करणाऱ्या मार्गरेट थैचर या ब्रिटन देशाच्या पहिल्या पंतप्रधान ठरल्या.
१९९१ : एरिट्रियाला (इथिओपियाकडून) स्वातंत्र्य मिळाले.
१९९४ : २६ फेब्रुवारी १९९३ रोजी न्यूयॉर्क येथील वर्ल्ड ट्रेड सेंटरमध्ये बॉम्बस्फोट घडवून आणणार्या चार मुस्लीम दहशतवाद्यांना प्रत्येकी २४० वर्षे कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली.
२००० : भारतीय अवकाश संशोधन संस्थेने विकसित केलेला 'इन्सॅट-३बी' हा उपग्रह पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या हस्ते राष्ट्राला अर्पण
२००१ : १८ व्या वर्षी माऊंट एव्हरेस्ट शिखर सर करणारा शेर्पा तेब्बा त्रेथी सर्वात लहान व्यक्ती ठरला.
२००४ : उत्तर कोरीय देशाने आपल्या देशांत मोबाईल फोनवर प्रतिबंध लावला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६८६ : डॅनियल फॅरनहाइट - जर्मन शास्त्रज्ञ (मृत्यू: १७३६)
१८१९ : व्हिक्टोरिया - इंग्लंडची राणी (मृत्यू: २२ जानेवारी १९०१)
१८४९ : सुप्रसिध्द डॉ. शास्त्रज्ञ ले. खर्नल कान्होबा रणछोडदास कीर्तीकर यांचा जन्म.
१८९६ : स्वातंत्र्यपूर्व भारतातील पंजाब राज्यातील थोर स्वातंत्र्य सेनानी व शहीद कम्युनिस्ट क्रांतिकारक आणि गदार पार्टीचे सदस्य कर्तारसिंग यांचा जन्मदिन.
१९२४ : रघुवीर भोपळे ऊर्फ 'जादूगार रघुवीर' - आंतरराष्ट्रीय कीर्तीचे जादूगार. त्यांनी 'फिरता जादूगार' व 'मी पाहिलेला रशिया' ही पुस्तके लिहिली आहेत. (मृत्यू: २० ऑगस्ट १९८४)
१९३३ : हेमचंद्र तुकाराम तथा बाळ दाणी - रणजी व कसोटी क्रिकेटपटू, कुशल क्रीडा संघटक (मृत्यू: १९ डिसेंबर १९९९)
१९४२ : माधव गाडगीळ - पर्यावरणतज्ञ
१९५२ : माजी भारतीय परराष्ट्र सचिव आणि ब्रिटनमधील भारतीय उच्चायुक्त रंजन मथाई यांचा जन्मदिन.
१९५४ : पद्मश्री व पद्मभूषण पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय गीर्यरोहक बचेंद्री पाल यांचा जन्मदिन.
१९७३ : भारतीय दिग्दर्शक, निर्माता आणि पटकथालेखक शिरीष कुंदर यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५४३ : निकोलस कोपर्निकस - सूर्यकेन्द्री विश्वाच्या संकल्पनेचा सिद्धांत मांडणारा पोलिश खगोलशास्त्रज्ञ आणि गणितज्ञ (जन्म: १९ फेब्रुवारी १४७३)
१८७९ : प्रख्यात अमेरिकन निर्मूलन, पत्रकार, उपग्रहवादी आणि समाजसुधारक विल्यम लॉयड गॅरिसन यांचे निधन.
१९५० : भारताचे वे४३ गर्वनर जनरल आर्चिबाल्ड वावेल यांचे निधन. (जन्म: ५ मे १८८३)
१९८४ : डब्ल्यू.डब्ल्यू.ई. चे स्थापक विन्स मॅकमोहन सीनिय यांचे निधन. (जन्म: ६ जुलै १९१४)
१९९० : लोकसभेचे माजी अध्यक्ष के. स. हेगडे यांचा मृत्यू.
१९९३ : बुलो चंदीराम रामचंदानी ऊर्फ बुलो सी. रानी - जुन्या पिढीतील संगीतकार व गायक (जन्म: ६ मे १९२० हैदराबाद)
१९९५ : हॅरॉल्ड विल्सन - इंग्लंडचे पंतप्रधान (जन्म: ११ मार्च १९१६)
१९९९ : विजयपाल लालाराम तथा 'गुरू हनुमान' - पद्मश्री आणि द्रोणाचार्य पुरस्कार विजेते कुस्ती प्रक्षिशक (जन्म: १५ मार्च १९०१)
२००० : मजरुह सुलतानपुरी - दादासाहेब फाळके पुरस्कार विजेते (१९९३) शायर, गीतकार आणि कवी (जन्म: १ आक्टोबर १९१९)
२०१४ : प्रसिद्ध भारतीय लेखिका व भारतीय राज्य राजस्थानमधील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या सदस्या लक्ष्मी कुमारी चुंडावत यांचे निधन.

## थोडक्यात

### सय्यद शोएबचे बारावीच्या परिक्षेत घवघवीत यश



मांजरसुंबा : येथील सय्यद शोएब तय्यब याने इयत्ता बारावीच्या परिक्षेत ७५.८० टक्के गुण घेऊन यश संपादन केले असून त्याच्या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. बीड तालुक्यातील मांजरसुंबा येथील सय्यद शोएब तय्यब विद्यार्थ्यांने अभ्यासाचे ध्येय समोर ठेवले आणि प्रतिकूल परिस्थितीत मात करुन त्याने ७५.८० गुण मिळवण्याची कामगीरी केली.शोएबने मिळविलेल्या घवघवीत यशा बद्दल त्याचे शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व इतर विविध स्तरातुन अभिनंदन करण्यात येत आहेत.

### स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचे यश

बीड : तालुक्यातील ताडसोन्ना येथील स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय येथील विज्ञान शाखेचा ९८.४२ टक्के तर कला शाखेचा ८८.८८ टक्के निकाल लागला. महाविद्यालयाचा एकूण निकाल ९६.३१टक्के एवढा लागला.महाविद्यालयात विज्ञान शाखेतून चोले रोहिणी कल्याण ८५.१७टक्के घेऊन महाविद्यालयातून प्रथम आली. तसेच ढाकणे अमृता रत्नाकर ८४.३३टक्के गुण घेऊन द्वितीय तर मुंडे माधुरी बाबासाहेब ८४% घेऊन तृतीय आलेली आहे. कला शाखेतून खरात शिवानी विलास ७९.३३टक्के गुण मिळवून प्रथम आलेली आहे तर डोळस निकिता जीवक ७६.३३टक्के घेऊन द्वितीय आलेली आहे. मुंडे सिद्धेश्वर कल्याण हा ७४.८३टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे. विद्यार्थ्यांच्या या या यशाबद्दल संस्थेचे सचिव डॉ.महादेव मुंडे, प्राचार्य सुधाकर मुंडे, सर्व प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

### गजानन महाविद्यालयाची निकालाची परंपरा कायम

राजुरीः महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, छत्रपती संभाजीनगर विभागाच्या वतीने फेब्रुवारी-मार्चमध्ये घेण्यात आलेल्या १२ वीच्या परिक्षेचा निकाल जाहीर झाला असून नवगण राजुरी येथील गजानन कनिष्ठ महाविद्यालयाचा शेकडा निकाल ९७.९४ टक्के एवढा लागला असून या महाविद्यालयाने उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नवगण राजुरी ता.जि.बीड येथील विज्ञान शाखेचा निकाल ९९.९२ टक्के, वाणिज्य शाखेचा शेकडा निकाल ९६.१५ टक्के तर कला शाखेचा शेकडा निकाल ९४.११ टक्के, व्यवसाय अभ्यासक्रम ८९.४७ टक्के इतका लागला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, राऊत, गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे, उपमुख्यध्यापक शिंदे , पर्यवेक्षक शेख, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

### ढेकळे महाविद्यालयाचे बारावी परीक्षेत यश

गेवराई : महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, छत्रपती संभाजीनगर विभागाच्या वतीने फेब्रुवारी-मार्चमध्ये घेण्यात आलेल्या १२ वीच्या परिक्षेचा निकाल जाहीर झाला असून पाडळसिंगी येथील कृषि पंडित भागुजीराव ढेकळे कनिष्ठ महाविद्यालयाचा शेकडा निकाल ९८.६१ टक्के ऐवढा लागला असून या महाविद्यालयाने निकालाची उज्वल परंपरा कायम राखली आहे. कृषि पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाडळसिंगी ता.गेवराई, जि.बीड येथील विज्ञान व वाणिज्य शाखेचा शेकडा निकाल १०० टक्के तर कला शाखेचा शेकडा निकाल ७५.७८ टक्के इतका लागला असून विज्ञान शाखेतून गुणानुक्रमे प्रथम वाघमारे अभिजीत भारत ९१.५०, द्वितीय चौधरी सृष्टी परमेश्वर ८९.३३, तृतीय गव्हाणे सचिन बाळू ८९.१७, वाणिज्य शाखेतून प्रथम होळकर करण महादेव ८३.८३, द्वितीय पौळ किर्ती पांडूरंग ७८.१७, तृतीय जायगुडे सुरज श्रीधर ७८.००, कला शाखेतून प्रथम सय्यद सानिया जावेद ८०.१७, द्वितीय पवळ कार्तिका शिवाजी ७९.३३, तृतीय शिंदे सारिका बळीराम ७८.५० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव जयदत्त क्षीरसागर, रोहित क्षीरसागर, डॉ.राजा मचाले, राऊत, प्राचार्य आण्णासाहेब थिटे, रावसाहेब भोसले, राजेंद्र सोनवणे, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

### अश्वलिंग विद्यालयाची यशाची परंपरा कायम

पिंपळवंडी : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांनी फेब्रुवारी/मार्च २०२४ मध्ये घेतलेल्या बारावी परीक्षेचा निकाल २१ मे २०२४ रोजी जाहीर करण्यात आला.त्यामध्ये पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री.अश्वलिंग विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले आहे. त्यामध्ये विज्ञान शाखेचा १००% टक्के व कला शाखेचा ९४.४४% टक्के निकाल लागला आहे.८२ टक्के मार्क घेऊन ओंकार दिलीप पवार प्रथम तर कु.श्रावणी श्रीकांत पवार ८१.६७% घेऊन दुतीय व विजय दादासाहेब पवार हा ८१.५०% गुण घेऊन तिसरा आला आहे.तसेच ३५ विद्यार्थी ७५ टक्के पेक्षा अधिक गुण घेऊन उत्तीर्ण झालेत.व ४० विद्यार्थी ६० टक्के पेक्षा अधिक गुण घेऊन यशस्वी झालेले आहेत.सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मा.आ.भिमराव धोंडे संस्था संस्थापक तथा अध्यक्ष शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी,तसेच डॉ.अजय धोंडे, प्रशासकीय अधिकारी डी.बी.राऊत, एस.जी.विधाते,गिलचे, बोडके,संजय शेंडे,प्राचार्य भोसले सह सर्व प्राध्यापक,शिक्षक, शिक्षकत्तेर कर्मचारी,पालक, पिंपळवंडी ग्रामस्थांसह सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

# मोक्षप्राप्ती झालेला ज्ञान शरिरी जीव सिद्ध म्हटला जातो

## साध्वी प्राचीश्री म.सा.यांचे विचार

बीड । प्रतिनिधी

केवळ ज्ञानाने सर्व पदार्थांना जाणणारा सशरिरी जीव अर्हता होय आणि सर्वोत्तम सुखप्राप्ती मोक्ष प्राप्ती झालेल्या ज्ञानशरिरी जीव हा सिद्ध म्हटला जातो. अशा मोक्षावस्थेचे वर्णन शब्दांनी करणे शक्य नाही. कारण की तिथे शब्दांची प्रवृत्तीच नसते. तिथे तर्कासही प्रवेश नसतो. कारण तिथे मानस- व्यापार संभव नसतात मोक्षावस्था संकल्प विकल्पातीतअसते. अशी मोक्ष अवस्था प्राप्त करण्यासाठी परमेश्वराचीच साधना करावी लागते.असे विचार परमपूज्य प्राचीश्री महाराज यांनी २३ मे रोजी जैन स्थानक महावीर चौक येथे प्रवचन देताना व्यक्त केले.

त्यापुढे म्हणाल्या, या साधनेमध्ये ज्ञान ,क्रिया, कर्माची आवश्यकता पडते ज्ञान मिळवणे हे आवश्यक ठरते. ज्ञानानुसारच माणसाची क्रिया ठरली जाते. क्रिया पालन व त्याचे आचरण हाच मुक्ती मार्ग अर्थात



मोक्ष मार्ग ठरू शकतो. यासाठी ज्ञानाचा समन्वय असणे मोक्ष मार्गासाठी सुकर ठरते. केवळ प्रवचनाचे श्रवण केल्याने त्यातून परिवर्तन होत नाही. तर त्यासाठी मिळालेले ज्ञान आचरणात आणणे अगत्याचे ठरते. यावर सांगताना त्यांनी भगवान बुद्धाचे उदाहरण दिले. भगवान बुद्धाला एका श्रावकाने प्रवचन ऐकूनही परिवर्तन होत नाही असे सुचवले. त्यावर त्यांनी श्रावस्ती नगरीला भेट देण्याचे सुचवले. ही श्रावस्ती नगरी येथून किती दूर आहे असे त्या श्रावकाने विचारले २४ कोस अंतरावर असणाऱ्या श्रावस्ती नगरीला जाण्याचे त्या श्रावकाने टाळले. पुढील भेटीचे वेळी विचारले असता परिवर्तन न होण्याचे कारण त्यांनी केलेली टाळाटाळ व दिरंगाई दिसून आली. यावरून जर प्रत्यक्षात त्या नगरीचे अवलोकन केले नाही तर ती नगरी कशी आहे हे कसे कळून येईल.त्याचप्रमाणे ज्ञानाने जोपर्यंत मोक्षाचे ज्ञान मिळत नाही तोपर्यंत तो सिद्ध ठरणार नाही हेही त्यांनी सांगितले. प्रवचनातून मिळालेले ज्ञान अंतर हृदयात उतरले तर त्यातील अशा आचरणाने माणूस परावर्तनशील होऊन सन्मार्गाला लागतो तर ज्याच्या मनात विवेक वैराग्य आणि भागवत भक्ती अधिक असते त्याचेच मन संसारातून निघून ईश्वराकडे झुकते असे साध्वी प्रसन्नाजी महाराज यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

पुढे त्या म्हणाल्या की, भक्ती केल्याशिवाय परमेश्वराची प्राप्ती होत नाही यासाठी परमेश्वरावर श्रद्धा ही असायला हवी.जर अंत: करणातून मनोभावे शालीनतेने देवाची पूजा, आर्चा, प्रार्थना केली तर देव प्रसन्न होतो मात्र आज अशी भावना आढळून येत नाही प्रत्येक जण भौतिक सुखाच्या पाठीमागे लागलेला दिसतो आणि त्याची अपेक्षाही भौतिक सुखाची असते. त्या ठिकाणी त्याची श्रद्धा आढळून येत नाही. श्रद्धा ठेवण्यासाठी माणसाच्या अंगी तीन गुणांची अत्यंत आवश्यकता आहे .एक त्याच्या अंगी विवेक असावा तो धैर्याने तोंड देणारा असावा आणि आनंदाने हसतमुख वागून प्रत्येक गोष्टीशी समरस राहावा तरच त्याची श्रद्धा ही परमेश्वराच्या ठिकाणी उमळून येते. विवेक न ठेवता सदैव घाई गडबडीत राहून धैर्य न दाखवता शांततेत न राहता घाई करणारा तसेच मनावर समाधान ,संयम न ठेवता आनंदी वृत्ती ने न वागणारा श्रद्धेला पात्र ठरत नाही. व तो परमेश्वराच्या सानिध्यात येत नाही. म्हणून शुद्ध अंतकरणाने प्रवचनाचे श्रवण करून आपण आनंदी असावे हे त्यांनी आजच्या मनोगतात बोलून दाखवले.

## सुगंधकुट्टी बुद्धविहार येथे गौतम बुद्ध जयंती साजरी

परळी । प्रतिनिधी


तथागत महात्मा गौतम बुद्ध यांच्या २५६८व्या जयंतीनिमित्त सुगंध कुट्टी बुद्धविहार परळी येथे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण, तसेच सामूहिक त्रिसरण पंचशील ग्रहण करण्यात आले, सर्वप्रथम तथागत महात्मा गौतम बुद्ध यांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण उपासक सूर्यकांत समिंदरसावळे यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी भीम नगर जगतकर गल्ली, प्रबुद्ध नगर, तसेच जयंती उत्सव पदाधिकारी,तसेच या भागातील बौद्ध उपासक,उपासिका,बालाक बालीका मोठ्या संख्येने उपस्थित होते. उत्साह पूर्ण वातावरणात जयंतीचा कार्यक्रम संपन्न झाला.



## हॉटेल साईतेजचा शुभारंभ मोठ्या उत्साहात

पिंपळवंडी । प्रतिनिधी

बीड-अंमळनेर-अहमदनगर या प्रमुख महामार्गावरील जाटनांदुर फाटा येथे दि.२१ मे २०२४ मंगळवार रोजी हॉटेल साईतेज व्हेज-नॉनव्हेज या नवीन हॉटेलचा शुभारंभ संत मंहत व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला.प्रथम प्रमुख पाहुणे व मान्यवरांचे शुभहस्ते फित कापून व श्रीफळ फोडून नवीन हॉटेलचे उद्घाटन करण्यात येऊन मान्यवरांनी नवीन व्यवसायाची भरभराट होवो अशी शुभकामना व्यक्त करून शुभेच्छा दिल्या.यावेळी यश भैया बाळासाहेब आजबे,सिंदफणा अर्बन बँकेचे अध्यक्ष आजिनाथ गवळी,जि.प.स.रामराव बडे,माजी जि.प.सदस्य कैलास जारे,माजी पं.स.उपसभापती शिरूर भाऊसाहेब



धनवडे,सरपंच सचिन माने,मा.सरपंच किशोर जेधे, ग्रा.पं.सदस्य संजय डोंगर, तसेच बबनराव सुरे, तबाजी इंगळे, शहादेव गुजर, राजेंद्र सकुंडे, अमोल पोकळे, वैभव नवले, विष्णू भिलारे, संतोष कोळपकर, प्रशांत तांगडे, पत्रकार बबनराव उकांडे, सुनील जेधे, के.टी.पवार आदीसह विविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, परिसरातील नागरिक, नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आलेल्या पाहुण्यांचे व मान्यवरांचे स्वागत हॉटेलचे प्रोप्रायटर वसंत नाना पारखे व सागर पारखे यांनी पुष्पगुच्छ देऊन व फेटा बांधून केले.

# दुष्काळ व दुष्काळ सदृश्य स्थितीबाबत प्रशासनाच्या सूचना

बीड । प्रतिनिधी

जिल्हयामध्ये जून ते सप्टेंबर २०२३ या कालावधीतील पर्जन्याची तुट, उपलब्ध असलेल्या भुजलाची कमतरता, दूरसंवेदन विषयक निकष, वनस्पती निर्देशांक, मृदू आर्द्रता, पेरणीखालील क्षेत्र व पिकांची परिस्थिती या सर्व घटकांचा एकत्रित विचार करुन या घटकांनी प्रभावित झालेल्या तालुक्यांमध्ये आपतीची शक्यता विचारात घेवून शासन निर्णय, महसूल व वन विभाग दि. ३१ ऑक्टोबर २०२३ दि. १६ फेब्रुवारी २०२४ व ११ नोव्हेंबर २०२३ अन्वये वडवणी, धारुर आणि अंबाजोगाई या तालुक्यांमध्ये गंभीर स्वरुपाचा दुष्काळ व बीड जिल्हयातील बीड, गेवराई, शिरुर, माजलगाव, केज, परळी, आष्टी आणि पाटोदा या तालुक्यातील महसुली मंडळामध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती घोषित करुन विविध सवलती लागू करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

बीड जिल्हयामध्ये आवश्यक तेथे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा टँकरव्दारे करण्यात येत आहे. आवश्यकतेनुसार टँकर मंजूरीचे अधिकार संबंधित उपविभागीय अधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. पाणीटंचाईच्या अनुषंगाने टँकर मंजूरीबाबत काही अडचण असल्यास संबंधित उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयाशी व पाणी टंचाईविषयी काही तक्रार, अडचण असल्यास कार्याकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद बीड तथा नोडल अधिकारी पाणी टंचाई यांच्याशी संपर्क साधावा. तसेच जिल्हयात कोठेही जनावरांच्या चा-याबाबत टंचाई भासत असेल तर डॉ. आर. डी. कदम, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त बीड यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. संपर्कासाठी दुरध्वनी, भ्रमणध्वनी क्रमांक खालीलप्रमाणे आहेत. नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड दुरध्वनी क्रमांक ०२४४२-२९९२९९, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बीड,भ्मणध्वनी क्र. ८६६८३८१२१५,उपविभागीय अधिकारी कार्यालय,बीड, (बाळू घोलप) ९९२२८४६४६५, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाटोदा (बाबर शेख) ९९७०६६५११५, उपविभागीय अधिकारी कार्यालय माजलगाव, (गणेश जवादे) ९७६७७५४५०१, उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई (सुर्यकांत गायकवाड) ९९७०८९५६२२, उपविभागीय अधिकारी परळी (बी.एल. रुपनर )९४२२९३०५४२ आणि जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, कार्यालय बीड दूरध्वनी ०२४४-२९७०२२ यावर संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ- मुंडे यांनी केले आहे.

### नियंत्रण कक्ष क्रमांक कार्यान्वित

अपत्कालीन परिस्थतीच्या वेळीची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयातील नियंत्रण कक्षास कळविण्यासाठी जिल्हयातील सर्व जनतेस नियंत्रण कक्षाचा दूरध्वनी क्रमांक ०२४४२-२९९२९९ तसेच पोलीस विभागाशी संपर्क साधण्यासाठी टोलफ्री क्रमांक १०० आणि अग्निशामक विभागाचा टोलफ्री क्रमांक १०१, अपत्कालीन सेवा ॲम्बुलन्स १०८ अपत्कालीन परिस्थितीमध्ये या क्रमांकावर संपर्क साधवा, असे जिल्हा अपत्ती व्यावस्थापन प्राधिकारण, आपत्ती व्यवस्थापन शाखा यांनी कळविले आहे.

## अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त रक्तदान शिबिरासह विविध कार्यक्रम

बीड । प्रतिनिधी

प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी अहिल्यादेवी यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यासाठी बाणाई सेवाभावी संस्था व अहिल्या महिला आघाडीच्या वतीने अहिल्यादेवी होळकर जयंतीची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. या करिता सदरची बैठक ही दि.२१ मे रोजी सुशिलाताई मोराळे व बाणाई महिला सेवाभावी संस्थेच्या मिनाक्षी देवकते यांच्या नेतृत्वामध्ये झाली.



तसेच अहिल्यादेवी होळकर यांची जयंती निमित्त रक्तदान शिबिरासह विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून या रक्तदान शिबिरामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

तसेच या कार्यक्रमाच्या वेळी समाजातील सर्व घटकांना आमंत्रित केले असून तृतीयपंथी असणार्या बीड येथील सपनाताई बाळू धुताडमल यांचा सत्कार देखील यावेळी करणार असल्याचे मिनाक्षी देवकते डोमाळे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांनी देशभरातील मंदिरे व ऐतिहातिक वास्तुंचे जतन करण्यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले तसेच देशातील स्त्री ही सुशिक्षित झाली पाहिजे यासाठी देखील प्रयत्न केले त्यांच्याच विचारावर चालण्यासाठी त्यांच्या जयंतीनिमित्त महिलांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, लहान मुलांसाठी चित्रकला स्पर्धा व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

## आर्यवैश्य कोमटी समाजाच्या पहिल्या जिल्हास्तरीय पालक मेळावा व स्नेहमिलन सोहळ्याचे आयोजन

केज

महाराष्ट्र आर्यवैश्य महासभा बीड जिल्ह्याच्या वतीने किल्लेधारूर याठिकाणी आर्यवैश्य कोमटी समाजाच्या एकदिवसीय पालक मेळावा व स्नेहमिलन सोहळ्याचे आयोजन रविवार दि २६ रोजी करण्यात आले आहे यावेळी जिल्ह्यातील समाजबांधवांची माहिती असलेल्या वासवी कुटुंबसंघ या पुस्तिकेचेही प्रकाशन करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष सुमित रुद्रवार व सचिव वैभव झरकर यांनी दिली आहे

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र आर्यवैश्य महासभेचे अध्यक्ष नंदकुमार गादेवार हे राहणार आहेत. मुख्य मार्गदर्शक म्हणून विवाह व समाजातील वाढते घटस्फोट याविषयावर जेष्ठ पत्रकार सुशील कुलकर्णी हे मार्गदर्शन करणार आहेत . यावेळी अन्न व औषध प्रशासन पुणे येथील सहाय्क आयुक्त शामसुंदर प्रतापवार यांची विशेष उपस्थिती राहणार आहे तसेच गोदरेज प्रा. ली. येथे वरिष्ठ उपाध्यक्ष म्हणून कार्यरत असलेले निलेश कोटलवार , बांधकाम समितीचे अध्यक्ष भानुदास वट्टमवार , राज्य संघटक प्रदीप कोकडवार , महिला महासभेच्या अध्यक्षा माधुरी कोले , महिला महासभेच्या कार्याध्यक्षा सुलभा वट्टमवार यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. दोन सत्रात विभागलेल्या या कार्यक्रमातील पहिल्या सत्रात वासवी कुटुंबसंघ या पुस्तिकेचे प्रकाशन , विवाह व समाजातील वाढते घटस्फोट याविषयावर मार्गदर्शन व खुली चर्चा होणार आहे तर दुसऱ्या सत्रात स्नेहमिलन कार्यक्रमाच्या माध्यमातून किल्लेधारूर येथील महिला गणेश वंदना व वासवी कन्यकादेवी जीवनगाथा, माजलगाव येथील महिला महिमा नारीशक्तीचा , अंबाजोगाई येथील महिला, डिजिटल महाराष्ट्र माझा , बीड येथील महिला संस्कार आई वडिलांचे , तर परळी वैजनाथ येथील महिला आनंदयोग या विषयांवर नृत्य व कला सादर करणार आहेत. तरी किल्केधारूर येथील नगरेश्वर मंदिर येथे आयोजित या समाजहितपयोगी कार्यक्रमास जिल्ह्यातील समाजबांधवांनी कार्यक्रमाचा उद्देश सफल करण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सूर्यकांत महाजन, अभय भावठणकर, आनंद भावठणकर , प्राजक्ता गुंडेवार,सुप्रिया चिद्रवार यांनी केले आहे.

# जगदंबा विद्यालय देवी निमगावच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन उत्साहात

अंमळनेर । प्रतिनिधी

यशवंत शिक्षण संस्था कर्जतचे श्री जगदंबा विद्यालय देवनिमगाव ता. आष्टी जि. बीड येथील विद्यालयामध्ये दिनांक १९ मे २०२४ रोजी १९९९ एसएससी बॅचचे गेट-टुगेदर मोठ्या उत्साहात संपन्न झाली संपन्न झाले. तब्बल २४ वर्षानंतर विद्यालयातील सर्व माजी विद्यार्थी एकत्रित आले. विशेष म्हणजे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देवी निमगाव येथून सकाळी ठीक नऊ वाजता. सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींनी बँड पथकासह प्रभात फेरी काढली. भारत माता की जय घोषाचे चे नारे दिले. सर्व विद्यार्थी व विद्यार्थ्यांना फेटे बांधून प्रभात फेरीमध्ये सहभागी झाले. विशेष म्हणजे या विद्यालयातील एकूण पाच विद्यार्थी भारतीय सैन्य दलाच्या सेवेत कार्यरत आहेत. एक मुख्याध्यापक, काही शिक्षक, तर काही व्यवसायिक क्षेत्रांमध्ये कार्यरत आहेत. एकूण ९८ विद्यार्थ्यांची ही बॅच होती.

या कार्यक्रमासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व श्री जगदंब विद्यालयातील सर्व गुरुजनांना निमंत्रित केले




होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्व गुरुजनांचे स्वागत पुष्पवृष्टी करून करण्यात आले. राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार , प्रदीप प्रजनन करून सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ी सेवानिवृत्त मुख्याध्यापक पाचे , प्रमुख पाहुणे मुख्याध्यापक शेटे,तळेकर,काकडे, गायकवाड, बिबे, पवार, भोसले, उदमले, पठाण, सरोदे, चव्हाण, राजगुरू, इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन वैष्णव शिंदे यांनी केले. प्रस्ताविक दादासाहेब पोकळे यांनी केले. सर्व गुरुजनांनी मनोगत व्यक्त केले. काकडे सरांनी सर्व जातीय धर्मावर आधारित कवाली गायन केले. सुशीला रांगोळे, सारिका मडके, फर्जना पठाण, शिवलीला मस्के, ताराबाई पाचे, गायत्री क्षत्रिय संतोष साळवे, दादासाहेब पोकळे, बबन दहिफळे, रवी मार्कंडे, अशोक जठार बाबा अनारसे, इत्यादी माजी विद्यार्थ्यांनीमनोगत व्यक्त केले. व विद्यार्थी देशातील सर्व जुन्या आठवणींना उजाळा दिला. अत्यंत मनमोकळ्यापणाने शालेय जीवनामध्ये आलेले अनुभव विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. तसेच माजी विद्यार्थी मुख्याध्यापक वैष्णव शिंदे सरांनी पूर्वीची शिक्षण पद्धती आत्ताचे शिक्षण पद्धती याचे महत्त्व सांगितले. पूर्वी अनेक अडचणीवर मात करून शिक्षण घ्यावे लागत होते. तसेच क्रीडा स्पर्धेमध्ये शालेय जीवनात अनेक विद्यार्थ्यांनी चांगली कामगिरी केल्यामुळे भारतीय सैन्य दलात भरती झाले. आम्ही कसे घडलो व आम्हाला सर्व गुरुजनांनी कसे घडवले याबाबत सविस्तर सांगीतले. अशोक जठार यांनी पुणे येथे यूपीएससी मार्गदर्शन क्लासेस अकॅडमी सुरू केली आहे. गावातील दरवर्षी २५ विद्यार्थ्यांना अकॅडमी मध्ये मोफत प्रवेश देण्यात येईल असे सांगितले. मुख्याध्यापक शेटे यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणामध्ये पाचे यांनी विद्यालयातील या बॅच मधील सर्व विद्यार्थी विषय अभिमान वाटतो आहे. कारण ही बॅच खूप हुशार होती.शाळेमध्ये गेट-टुगेदर साजरे केल्यामुळे पुढील विद्यार्थ्यांना याचा नक्कीच फायदा होईल. चांगला आदर्श घालून दिला आहे. कविवर्य नारायण सुर्वे यांच्या कवितेने अध्यक्ष भाषणाचा समारोप केला. तसेच माजी विद्यार्थी तथा फौजी बबन दहिफळे यांनी जगदंबा विद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून जे विद्यार्थी किमान ९२ टक्के मिळवतील त्यांना रोख अकरा हजार रुपयांचे बक्षीस देण्यात येईल. असे सांगितले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दादासाहेब पोपळे, दत्ता फिसके, ताराबाई पाचे, सुशीला रांगोले, सुनिता आंधळे, शिल्पा बलदोटा, स्वाती परदेशी, भारती फिसके, शरयू शिंदे, जिजाबाई ढवळे, फर्जना पठाण, निलोफर शेख, मुक्ता तळेकर, विद्या डाळिंबकर, सारिका मडके, गायत्री क्षत्रिय, अरुण अनारसे, नवनाथ राऊत, रवींद्र मार्कंडे, आनंद नवकर, विनोद पंडागळे, आदिनाथ तळेकर, बबन दहिफळे, अशोक जठार, संतोष साळवे, शिवाजी अनारसे, भाऊ किसके, अशोक आग्रे, विष्णू आंधळे, सोमीनाथ जठार, सुखदेव आंधळे, गोविंद आंधळे, इत्यादी सर्व विद्यार्थ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. तसेच कार्यक्रम दोन सत्रा मध्ये संपन्न झाला. कार्यक्रमाचे आभार मुक्ता तळेकर यांनी मानले.

# लाचखोर कार्यकारी अभियंता राजेश सलगरच्या घरातही सापडले घबाड

## पावणे बारा लाखाची रोख रक्कम, सोने, चांदीच्या दागिन्यांसह साडे सोळा लाखाचा मुद्देमाल एसीबीकडून जप्त

**बीड । प्रतिनिधी**

आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हरिभाऊ खाडे यांच्या घर झडतीमध्ये एक कोटी रोख, एक किलो सोन्याची दागिने आणि पाच किलो चांदी असा मुद्देमाल सापडला होता. त्यानंतर काल परळीत केलेल्या कारवाईत कार्यकारी अभियंता राजेश सलगर याची बीड एसीबीच्या टीमने घरझडती घेतली असता मोठे घबाड सापडले आहे.

पोलीस ठाणे परळी शहर कलम ७ , भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ मधील मुख्य आरोपी राजेश आनंदराव सलगरकर, कार्यकारी अभियंता माजलगाव पाटबंधारे विभाग,



परळी याचे आनंद नगर गंगणे यांचे घरी गजानन बिल्डिंग येथील किरायाचे राहते घरात २२ मे रोजी आरोपी सलगर व पंचासमक्ष घर झडती घेतली. यावेळी झडतीमध्ये रोख रक्कम ११ लाख ७८ हजार ४६५ रुपये, सोन्याची दागिणे एकुण ३० ग्रॅम किंमत अंदाजे २ लाख १० हजार रुपये व चांदी ३ किलो ४०० ग्रॅम किंमत अंदाजे २ लाख ७२ हजार रुपये असा १६ लाख ६० हजार ४६५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई उपअधीक्षक शंकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गुलाब बाचेवाड, अंमलदार सुरेश सांगळे, सुदर्शन निकाळजे, स्नेहलकुमार कोरडे, गणेश मेहेत्रे यांनी केली.

# पावसाळ्याच्या तोंडावर नाल्या तुंबलेल्या

## पावसाळ्यापूर्वी नाल्यांची सफाई करण्याची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

पावसाळा तोंडावर आला तरी बीड शहरातील नाल्या तुंबलेल्याच असून पावसाळ्यापूर्वी शहरातील सर्व नाण्यांची सफाई करावी अशी मागणी नगरपालिका प्रशासनाकडे नागरिक करत आहेत.

पूर्ण मे महिना कडक ऊन्हानंतर आता पावसाळा सुरू होण्याच्या मार्गावर आहे. मात्र शहरातील नाल्या कचऱ्याने तुडुंब भरलेले आहेत. पावसाळ्यापूर्वी या नाल्याची सफाई झाली नाही तर हा सर्व कचरा आणि दुर्गंधी रस्त्यावर येऊन नागरिकांच्या आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. तसेही पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात रोगराई वाढते. डासांचे प्रमाण कमी झाले तर काही प्रमाणात नागरिकांना दिलासा मिळणार आहे. मात्र जर शहरातील नाल्यांची सफाई झालीच नाही तर मग मात्र शहरातील नागरिकांच्या आरोग्याला मोठा धोका निर्माण होणार आहे. त्यामुळे प्रशासनाने वेळीच याची काळजी घेऊन बीड शहरातील सर्व नाल्या पावसाळ्यापूर्वी साफ केल्या तर ही दुर्गंधी रस्त्यावर येणार नाही. आणि नागरिकांच्या आरोग्य धोक्यात येणार नाही. याची जबाबदारी प्रशासनावर असून नगरपालिका प्रशासनाने हा धोका वेळीच ओळखून शहरातील नाले सफाई करावी अशी मागणी शहरातील नागरिक करत आहेत.



# वीज खंडित होत असल्याने परळीकर हैराण

## अन्यथा तीव्र आंदोलन -ॲड.मनोज संकाये

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी शहरात दिवसातून २५ वेळेस वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रकार वारंवार वाढले आहेत, सध्या उन्हाळा सुरू असून ४२ सेल्सिअस तापमान झाले आहे. यामुळे व्यापारी वयोवृद्ध नागरिक महावितरणच्या भोंगळ कारभाराला कंटाळले असून लवकरात लवकर वीज पुरवठा सुरळीत करावा अन्यथा लवकरच शहरातील वीज पुरवठा सुरळीत करा अन्यथा तीव्र आंदोलन केले जाईल अशा ईशारा सामाजिक कार्यकर्ते मनोज संकाये यांनी दिला.

याबाबत ॲड. म्हणून सांग काही यांनी प्रसिद्धीस दिलेल्या



पत्रकात म्हटले आहे की, शहरात गेले कित्येक दिवसापासून परळी शहरामध्ये नागरीकांना तथा आपल्या ग्राहकांना पुर्व कल्पना न देता वारंवार वीज खंडीत केली जात आहे. गेल्या १५ दिवसामध्ये वीज खंडीत होण्याचे प्रमाण चाढल्याचे दिसून येत आहे. काल बुधवारी मोंढा भागातील वीज पुरवठा रात्री उशिरापर्यंत खंडित होता त्याची पुनरावृत्ती आज गुरुवारी सकाळी सात वाजल्यापासून वीज पुरवठा बंदच आहे.दरम्यान थोड्या प्रमाणात वादळी वारे सुटले की लगेच वीज खंडीत होते. तसेच उन्हाळ्याचे दिवस सुरु असून उष्णेतेची तीव्रता वाढली असून लाईट गुल होण्याचे प्रमाण वाढले असून नागरिक हैराण झाले आहे. त्याचप्रमाणे पुढील महिन्यात पावसाळा सुरू होत असून मान्सून पूर्व तयारी कुठेही दिसून येत नाही. तसेच विद्युत तारांवरील झाडांच्या फांद्या तोडून उचलून घेऊन जाव्यात आणि

# पावसाळ्यापूर्वी शहरातील नदी, नाले सफाई करण्याची मागणी

**परळी । प्रतिनिधी**

पावसाळा उंबरठ्यावर येऊन ठेपला तरी शहरातील नाले सफाईची कामे नगरपरिषद प्रशासनाने सुरू केली नसल्याने पावसाळ्यात घर-दुकानात पाणी शिरून नुकसान होऊ शकते हे टाळण्यासाठी त्वरित नगरपरिषद प्रशासनाने नालेसफाई करावी अशी मागणी भाजपाचे अश्विन मोगरकर यांनी केली आहे.

परळी नगर परिषदेच्या मार्फत दरवर्षी शहरातील नदी-नाले सफाई मोहीम मे महिन्यात केली जाते. परंतु यावर्षी नगरपरिषदेच्या निवडणुका न झाल्याने लोकनियुक्त नगरसेवक नसल्याने प्रशासनावर कोणाचाही अंकुश राहिलेला नाही. मुख्याधिकारी कधीही शहरात



फिरून नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्याचे दिसून येत नाहीत. नगर परिषद मूलभूत सुविधा नागरिकांना देण्यास असमर्थ ठरत आहे. यावर्षी पाऊसकाळ चांगला असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

पावसाळ्यापूर्वी शहरातील नाले, सरस्वती नदीची सफाई केली जाते. यावर्षी गावभागात असलेली सरस्वती नदी कचरा, प्लास्टिक, झाडेझुडपे व माती दगडांनी अक्षरशः भरून गेली आहे. नगरपरिषदेच्या कर्मचारी, अधिकाऱ्यांचा कुठलाही धाक नसल्याने नागरिकांनी घराच्या बांधकामातून उरलेले माती दगड व इतर साहित्य सरस्वती नदीत टाकले आहेत. नदीत वाढलेल्या झाडेझुडपामुळे नदी अरुंद बनली आहे. कचऱ्यामुळे वरहाचा मुक्त संचार होत असून आजूबाजूच्या नागरिकांचा याचा त्रास वाढला आहे. दोन दिवसांपूर्वी सफाई विभागाने अंबेवेस पुलाच्या बाजूला थातूर मातूर सफाई केली. वरवरचा कचरा उचलला परंतु अंबेवेस पासून पुढे कचरा मातीचे ढीग तसेच ठेवल्याने पावसाळ्यात पाणी अडून घरा दारात जाण्याची शक्यता आहे. पावसाळ्यापूर्वी केली जाणारी नदी नाले सफाई न केल्याने आगामी पावसाळ्यात अंबेवेससह गावभागातील नागरिकांच्या घर दुकानात पाणी शिरू शकते. होणाऱ्या नुकसानीची जबाबदारी नगरपरिषद प्रशासन जबाबदार राहील यामुळे त्वरित सरस्वती नदीसह नालेसफाई त्वरीत सुरू करावी अशी मागणी भाजपाचे अश्विन मोगरकर यांनी केली आहे.

# बोर्ड परीक्षेत कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाची उज्ज्वल यशाची परंपरा कायम

## बारावी कला शाखेचा १००% तर विज्ञान शाखेचा ९८.६०% निकाल

**अंमळनेर । प्रतिनिधी**

अंमळनेर (भां) येथील कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाने याहीवर्षी एच.एस.सी. परीक्षेतील उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली असून महाविद्यालयाच्या कला शाखेचा निकाल १००% लागला असून विज्ञान शाखेचा निकाल ९८.६०% लागलेला आहे.



फेब्रुवारी/मार्च-२०२३ मध्ये झालेल्या बोर्ड परीक्षेमध्ये या महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचा निकाल ९८.६०% लागला असून पवार गौरी मनोहर ही विद्यार्थीनी ९०.८३% गुण मिळवून विज्ञान शाखेतून प्रथम आली आहे. महाविद्यालयाच्या या नेत्रदीपक यशाबद्दल मा.आ.भीमराव धोंडे, महाविद्यालयातचे प्राचार्य डॉ.एन.डी.चौधरी,उपप्राचार्य बी.एम.बनसोडे, भैरवनाथ विद्यालयाचे मुख्याध्यापक वैष्णव शिंदे, एस.एम.भूकन, एस.बी.विधाते, बी.एस.पवार,मिसाळ,बेदरे, श्रीमती भराटे, कदम,सतिश नाना पवार,,सर्व महाविद्यालयीन कमिटी सदस्य ,व्यवस्थापन समिती सदस्य, व्यवस्थापन व विकास समिती सदस्य तसेच सर्व शिक्षक-प्राध्यापक कर्मचारीवृंद यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### जिवाचीवाडी तलावात बुडून तरूणाचा मृत्यू

येवता । प्रतिनिधी

केज तालुक्यातील जिवाची वाडी येथील साठवण तलावात दारू पिऊन नशेत दुपारी १२ वाजता मासे धरण्यासाठी गेले नितीन मच्छिंद्र काळे वय-३४ वर्ष यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला त्यांना पोहता येत होते! परंतू ते मासे पकडण्याच्या जाळ्यात अडल्याने त्यांचा मृत्यू झालेचे प्रथम माहिती वरून दिसून येते मृत्तदेह शोधन्यासाठी परळी-वै. येथील बचावकार्य पथकास पाचारन केले.



# जि.प.शाळेचे प्रविण पंडित एनसीसी अधिकारी म्हणून नियुक्त

**गेवराई । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचे चे शिक्षक प्रवीण पंडित यांनी दि ०८ एप्रिल २०२४ ते २२ मे २०२४ या ४५ दिवसाचे काळात आर्मीचे कठोर प्रशिक्षण, एनसीसी अधिकारी प्रशिक्षण केंद्र, कामटी, नागपूर येथे पूर्ण केले. माध्यमिक शिक्षक प्रवीण पंडित यांना एनसीसी ची कमिशन रैंक प्राप्त झाली असून त्यांची असोसिएट एनसीसी अधिकारी () म्हणून नियुक्ती झाली. ४५ दिवसाचे कठोर परिश्रम, शिस्त आणि वेळेचे काटेकोर पालन व शारीरिक मेहनत करून यशस्वीरीत्या प्रशिक्षण पूर्ण केल्यामुळे त्यांना लेफ्टनंट ही रैंक मिळाली. त्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे, शाळेचे प्रमुख पोपळघट सर, सर्व शालेय सहकारी, गुड मॉर्निंग ग्रुप राजाभाऊ



घुंबार्डे, प्रा हिंगे सर, विक्रम काळे, राजाभाऊ आर्दड, शिवाजीराव मोटे, डॉ आतकारे, प्रा भोसले, पाचपुते दादा, प्रा जरांगे सर, सर्व सदस्य व गोदावरी परिवारातील प्रभाकर पराड, गणेश शहाणे, शेख अनिस, स्वामी महाराज, सर्व कर्मचारी व मान्यवरांनी त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला.

# शेतीच्या वादातून एकाचा खून

## गेवराई तालुक्यातील मानमोडी येथील घटना

गेवराई । प्रतिनिधी

तालुक्यातील मानमोडी येथे शेतीच्या वादातून बापूराव रंगनाथ शेळमकर वय वर्षे ३५ याचा आज दि. २३ रोजी सकाळी सात वाजता शेतीमध्ये पुतण्या भुजग शेळमकर चुलता तिर्थराज शेळमकर / उद्धव शेळमकर चुलत भाऊ यांच्यासोबत

हाणामारी झाली होती यात ते जखमी झाले होते त्यांना वैद्यकीय उपचारासाठी बीड येथे उपचारासाठी जात असताना मृत्यू झाला असल्याचे बोलले जात शेतीच्या वादातून खून झाला



असल्याची चर्चा सध्या सर्वत्र होत आहे.सदर झालेल्या शेतीच्या वादावरून हाणामारीत बापूराव रंगनाथ शेळमकर यांचा मृत्यू झाला असून या प्रकरणी बीड पोलिस चौकीमध्ये खुनाचा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे .

# नाथपंथी समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी कटिबध्द -डॉ.योगेश क्षीरसागर

## बीडमध्ये श्री गुरु गोरक्षनाथ अनुग्रह दिन व सामुहिक नाथ दिक्षा कार्यक्रम

**बीड । प्रतिनिधी**

नाथपंथी समाज हा अत्यंत शिस्तप्रिय समाज आहे. समाजातील तरुण आता शिक्षण क्षेत्रात प्रगती करू लागले आहेत. समाजातील तरुणांना योग्य दिशा दाखवण्याचे काम ज्येष्ठांनी केले पाहिजे. प्रभू गोरक्षनाथांच्या आशिर्वादाने आपण समाजाच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहून प्रत्येक अडीअडचणी सोडवण्यासाठी कटिबद्ध राहू, असे आश्वासन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिले आहे.

शहरातील आशीर्वाद लॉन्स येथे अखिल भारतीय नाथपंथी समाज महासंघ, नाथमुद्रा प्रतिष्ठान




व नाथमुद्रा बचत गट, बीडच्यावतीने श्री गुरु गोरक्षनाथ अनुग्रह दिन व सामुहिक नाथ दिक्षा कार्यक्रमाचे गुरुवारी (दि.२३) आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते. विशेष अतिथी म्हणून अखिल भारतीय नाथपंथी समाज महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा मुंबईचे नगरसेवक डॉ.जयाजी नाथ, डॉ. के.बी. पैठणकर, महासंघाचे सचिव व्ही.बी. नाथ, मराठवाडा अध्यक्ष सोमनाथ धायडे आदींची उपस्थिती होती. याप्रसंगी नगर जिल्हाध्यक्ष कांचन धायडे, लातूर अध्यक्ष दत्ता सूर्यवंशी, सोलापूरचे जिल्हाध्यक्ष संजय चव्हाण, धाराशिवचे जिल्हाध्यक्ष संतोष चव्हाण, नगरचे जिल्हाध्यक्ष राहुल कासार, बीडचे जिल्हाध्यक्ष भरतनाना चव्हाण, परळीचे भरत महाराज जोगी, प्रा.बालकनाथ यादव यांच्यासह महासंघाचे पदाधिकारी, समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सभागृहाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील

शहरात समाजासाठी सामाजिक सभागृह उभारावे अशी मागणी नाथपंथी समाजातून करण्यात आली. या मागणीवर सकारात्मक प्रतिसाद देत डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शहरात जागा उपलब्ध करू देऊ. त्यानंतर सभागृहाचा प्रश्न मार्गी लावू, अशी ग्वाही दिली आहे.

### नाथपंथी समाजाचे संघटन करणार

राज्यभरातील नाथपंथी समाजाचे संघटन करणार असल्याचे अखिल भारतीय नाथपंथी समाज महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा मुंबईचे नगरसेवक डॉ.जयाजी नाथ यांनी म्हटले. समाजाच्या विविध प्रश्नावर आवाज उठविण्यासाठी आपण कटिबध्द असल्याचे त्यांनी म्हटले.

# जरांगे पाटील यांच्या सुरक्षा व्यवस्थेत वाढ करा - सकल मराठा समाज

**मादळमोही । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणावर प्रशासनाच्या विरोधात लोकशाही मार्गाने आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील बीड जिल्ह्यातील काही राजकीय व्यक्तींच्या कार्यकर्त्यांनी मा. मनोज जरांगे पाटील यांच्यावर सोशल मीडियावरुन त्यांना जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात असून त्यामुळे त्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे.तरी राज्य शासनाला पत्रव्यवहार करून त्यांच्या सुरक्षा व्यवस्था मध्ये वाढ करावी अशी मागणी सकल मराठा बांधवांच्या वतीने करण्यात आली आहे.

राज्यभरात लोकसभा निवडणुकीचे वारे चालू असून




## बीड जिल्हाधिकारी यांना दिले निवेदन

गेल्या दि.१३ मे रोजी बीड ३९ लोकसभा मतदारसंघात निवडनुक प्रक्रिया पार पडली परंतु ही प्रक्रिया पार पडत असताना मा. मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी कुठल्याही पक्षाला किंवा उमेदवाराला पाठिंबा दिला नसून बीड जिल्ह्यातील काही राजकीय व्यक्तींच्या कार्यकर्त्यांनी मा. मनोज जरांगे पाटील यांच्यावर सोशल मीडियावरुन त्यांना जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात असून त्यामुळे त्यांच्या जीवितास धोका ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुणे पोर्शे अपघात: आरोपीचे आजोबाही संशयाच्या भोवऱ्यात

**पुणे । प्रतिनिधी**

पोर्शे अपघाताला प्रख्यात बिल्डर विशाल अग्रवाल यांचा अल्पवयीन मुलगा कारणीभूत ठरला. यानंतर बिल्डर पितापुत्रांना पुणे पोलिसांकडून अटक करण्यात आली. दोघांनाही न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान अल्पवयीन आरोपीच्या आजोबांना या प्रकरणाच्या चौकशीसाठी पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या कार्यालयात (झींपिश झेींीलहश उरी -ललळवशपीं) आणण्यात आले आहे. या संदर्भातील वृत्त एएनआयने दिले आहे.

पुण्यातील कल्याणीनगर परिसरात रविवार १९ मे रोजी भीषण अपघात झाला. भरधाव वेगात आलेल्या पोर्श





कारने दुचाकीस्वाराला मागून धडक दिल्याने यामध्ये दोघांचा मृत्यू झाला. या प्रकरणात अल्पवयीन आरोपी आणि त्याचे वडील विशाल अग्रवाल या दोघांनाही कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान आरोपीचे आजोबा देखील संशयाच्या भोवऱ्यात अडकले आहेत.

काय आहे प्रकरण?

पुण्यात रविवारी (दि.१९) पहाटे भरधाव पोर्शे कारने दुचाकीला धडक दिली, यात तरुण-तरुणी ठार

संशयित आरोपी अल्पवयीन; 'ब्रह्मा ग्रुप'चे विशाल अग्रवाल यांचा मुलगा मुलाकडे वाहन परवाना नसताना वडिलांनी पोर्शे कार चालवायला दिली होती.

यानंतर अल्पवयीन मुलांचे वडील हे आरोपीच्या जाळ्यात अडकले.

यानंतर अल्पवयीन आरोपीचे आजोबां देखील संशयाच्या भोवऱ्यात आहेत.

अग्रवाल कुटुंबाचं अंडरवर्ल्ड कनेक्शन

पुणे पोर्शे अपघात प्रकरणात नवनवे खुलासे समोर येत आहेत. अल्पवयीन आरोपीच्या कुटुंबीयांचे अंडरवर्ल्डशी कनेक्शन असल्याची कळते. आरोपीचे आजोबा सुरेंद्रकुमार अगरवाल यांचे छोटा राजनशी संबंध असल्याची धक्कादायक माहिती देखील समोर आली आहे.



## पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट असोसिएशनच्या वतीने वकील बार रूम बुद्ध पौर्णिमा साजरी

पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट असोसिएशनच्या वतीने वकील बार रूम बुद्ध पौर्णिमा साजरी करण्यात आली. या वेळी माजी अध्यक्ष ॲड.नारायण (नाना) रसाळ, ॲड.सुनिल कडूसकर, ॲड.प्रतिक जगताप,ॲड.अमोल लक्ष्मण खांडेकर, ॲड.अरुण (मामा) खरात, ॲड.बी.के कांबळे, ॲड. नारायण थोरात, ॲड.अजय यादव,ॲड.सूर्यकांत कोंडे,ड.एन.व्ही कुटे,ॲड. सागर पोवर इ.वकील मान्यवारांनी यांनी गौतम बुद्धानी आदर्श जीवन शैली जगण्याचे तत्व ज्याची आज सर्व जगाला गरज आहे या संदर्भात माहिती दिली. या कार्यक्रमाचे आयोजन पिंपरी चिंचवड डव्होकेट असोसिएशनच्या अध्यक्षा ॲड.प्रमिला गाडे, उपाध्यक्ष ॲड.गोरख कुंभार, महिला सचिव ड.वर्षा तिडके - कांबळे, सदस्य ॲड.जयेश वाकचौरे, ॲड.साक्षी धुमाळ, ॲड.तेजश चवरे, ॲड.विशाल पौळ यांच्याकडून करण्यात आले.

## राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या धडक मोहिमेत ३२ परवाना कक्ष अनुज्ञप्तीवर कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

कल्याणीनगर पुणे येथील अपघाताच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाकडून मागील तीन दिवसात १४ पथकांमार्फत राबविण्यात आलेल्या धडक मोहिमेत ३२ विविध परवाना कक्ष अनुज्ञप्तीवर गुन्हे दाखल केले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार या अनुज्ञप्तींचे व्यवहार तात्काळ प्रभावाने बंद ठेवण्यात आले असून सर्व अनुज्ञप्ती सील करण्यात आलेल्या आहेत.

या कारवाईत १० रूफटॉप, अंदाजे १६ पब, इतर ६ परवाना कक्ष बार अशा एकूण ३२ अनुज्ञप्तींचे व्यवहार तात्काळ प्रभावाने बंद ठेवण्याचे आदेश पारित केले असून सर्व अनुज्ञप्ती सील करण्यात आलेल्या आहेत. जिल्हाधिकारी, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त, उपआयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे जिल्ह्यात धडक मोहिम राबविण्यात येत आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागांकडून वारंवार अनुज्ञप्तींच्या गैरव्यवहाराबाबत कारवाई करण्यात येते. कोझी बारवर आता अनुज्ञप्तीचे व्यवहार बंद केल्याची कारवाई केलेली असली तरी दोन महिन्यापूर्वीही राज्य उत्पादन शुल्क विभागाने विभागीय गुन्हा नोंद केलेला आहे.

२०२३-२०२४ मध्ये राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाकडून एकूण २९७ अनुज्ञप्तीवर विविध कारणांसाठी गुन्हे नोंद करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये १ कोटी १२ लाख रुपये इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे. १७ अनुज्ञप्तींवर निलंबनाची कारवाईदेखील करण्यात आली असून २ अनुज्ञत्या कायमस्वरुपी बंद करण्यात आल्या आहेत. एप्रिल २०२४ पासून आजतागायत ५४ अनुज्ञप्त्यांवर गुन्हे नोंद करण्यात आलेले असून ५ लाख रुपये इतका दंड वसुल केलेला आहे. यात एकूण ३२ अनुज्ञप्त्या सील करण्यात आलेल्या आहेत. राज्य उत्पादन शुल्क विभाग नियोजनबद्ध कारवाई करीत असून अनुज्ञप्ती विहीत वेळेनंतर सुरू ठेवणे, अल्पवयीन मुलांना मद्यविक्री करणे, अवैध ठिकाणांवर (रुफटॉपवर) मद्यविक्री करणे या बाबत सर्व पथकांकडून तपासणी मोहिम सुरू आहे. विभागाकडे मद्यसेवन परवाने मुबलक प्रमाणात उपलब्ध असून ऑनलाईन पद्धतीनेही शुलळीशीर्शींळलशी.ारहरेपश्रळपश.सींं.ळप या संकेतस्थळावरून देखील मद्यपरवाने देण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. वरील गैरव्यवहारासंदर्भात नागरिकांच्या तक्रारी असल्यास टोल फ्री क्रमांक १८००२३३९९९९ किंवा व्हॉटसअप क्रमांक ८४२२००११३३ वर तक्रार देण्याचे आवाहान राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या आयुक्तांनी केले आहे.

## ऑनलाईन रक्कम भरल्यानंतरच कोषागारातील रक्कम मिळणार असल्याचे दूरध्वनी बनावट

**पुणे । प्रतिनिधी**

निवृत्तीवेतनधारकांना ऑनलाइन रक्कम भरल्यानंतरच कोषागारातील थकीत रक्कम मिळणार आहे, अशाप्रकारचे दूरध्वनीद्वारे कळविण्यात येत असल्याबाबतच्या तक्रारी कोषागार कार्यालयास प्राप्त झाल्या आहेत. या अनुषंगाने कोणत्याही प्रकारचे दूरध्वनी जिल्हा कोषागार कार्यालयामार्फत करण्यात येत नसून कोषागार कार्यालयातील कर्मचाऱ्यास निवृत्तीवेतनधारकांच्या घरी पाठविण्यात येत नसल्याबाबत पुणे कोषागार कार्यालयाकडून आवाहन करण्यात येत आहे.

कोषागारामार्फत निवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतन, सुधारित निवृत्तीवेतन कुटुंबनिवृत्तीवेतन तसेच निवृत्तीवेतन विषयक इतर लाभ प्रदान करताना कोणत्याही प्रकारे वसुलीबाबत किंवा प्रदान करण्यात येणाऱ्या रकमेबाबत कोषागार कार्यालयामार्फत दूरध्वनी करून संपर्क साधला जात नाही किंवा ऑनलाइन व्यवहार करण्याविषयी कळविण्यात येत नाही. कोषागार कार्यालयामार्फत फक्त लेखी स्वरुपात पत्र व्यवहार केला जातो. निवृत्तीवेतनधारक व कार्यरत कर्मचाऱ्यांना दूरध्वनी किंवा भ्रमणध्वनीवरून संपर्क साधून रक्कम ऑनलाइन, गुगल पे, फोन पे किंवा इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे भरण्याबाबत जिल्हा कोषागार कार्यालयामार्फत कळविले जात नाही.

तरी निवृत्तीवेतनधारक व कार्यरत कर्मचाऱ्यांनी अशा दूरध्वनी संदेशास प्रतिसाद देऊ नये. परस्पर रक्कम भरल्यास ती निवृत्तीवेतनधारकाची वैयक्तिक जबाबदारी राहील. अशाप्रकारे कोणी दूरध्वनीवरुन संपर्क साधल्यास किंवा कोणतेही व्यवहार करण्यापूर्वी शंका असल्यास प्रथमतः कोषागार कार्यालयाशी संपर्क साधण्यात यावा, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी व अप्पर कोषागार अधिकारी (निवृत्तीवेतन) यांनी केले आहे.

### आमदार पी. एन. पाटील यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांची श्रद्धांजली

मुंबई :- कोल्हापूर जिल्ह्यातील कॉंग्रेसचे आमदार पी एन पाटील यांच्या निधनाचे वृत्त धक्कादायक आहे. कोल्हापूरच्या जनतेशी एकरुप झालेले नेतृत्व, धडाडीचे लोकप्रतिनिधी, कर्तव्यनिष्ठ लोकसेवक अशी त्यांची ओळख होती. त्यांच्या निधनाने जनतेशी घट्ट नाळ जुळलेले नेतृत्व आपण गमावले आहे. कोल्हापूरच्या सामाजिक, राजकीय क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. दिवंगत पी. एन. पाटील यांच्या कुटुंबियांच्या, सहकाऱ्यांच्या, कार्यकर्त्यांच्या दुःखात आम्ही सर्वजण सहभागी असून मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहतो. अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त करुन श्रद्धांजली वाहिली.

# निकालाआधीच आंबेगावात लागले उमेदवारांच्या विजयाचे बॅनर

मंचर । प्रतिनिधी

लोकसभा निवडणूक निकालाची तारीख जवळ येत असताना कोणता उमेदवार निवडून येणार, याबाबत कार्यकर्त्यांमध्ये धाकधूक वाढली आहे. शिरूर लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडी व महायुतीच्या कार्यकर्त्यांनी आपल्या उमेदवाराच्या विजयाचे बॅनर लावले आहेत. या बॅनरमुळे दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांनी शिरूरचा निकाल अधिकृतपणे जाहीर होण्याआधीच आपल्या नेत्यावर गुलाल उधळला आहे. राज्यातील लोकसभा निवडणुकीच्या पाचही टप्प्यांतील मतदान प्रक्रिया पार पडली असून, येत्या ४ जून रोजी निवडणुकीचा निकाल लागणार आहे. निवडणूक निकालाची तारीख जसजशी जवळ येत आहे, तसतसे सर्वच पक्षांचे कार्यकर्ते, नेत्यांचे समर्थक आपल्या नेत्याचे विजयाचे बॅनर लावताना दिसत आहेत.

पुणे जिल्ह्यात महत्त्वाच्या समजल्या जाणार्या शिरूर लोकसभा मतदारसंघातही महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील आणि महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे



यांच्या समर्थकांनी त्यांच्या विजयाचे बॅनर लावले आहेत. आंबेगाव तालुक्यातील मंचर, पारगाव या गावांमध्ये हे बॅनर झळकत आहेत. शिरूर लोकसभा मतदारसंघात दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये चुरशीची निवडणूक झाली. गेल्या वेळी २०१९ मध्ये शिवसेनेकडून निवडणूक लढविलेले माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील हे या वेळी राष्ट्रवादीकडून, तर राष्ट्रवादीकडून निवडणूक लढविलेले डॉ. अमोल कोल्हे हे या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून रिंगणात होते.

डॉ. अमोल कोल्हे यांच्यासाठी ज्येष्ठ नेते शरद पवार, आदित्य ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी, तर महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, रामदास आठवले, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या दिग्गज नेत्यांनी सभांचा फड गाजविला. सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी ऑनलाइन पद्धतीने कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करून प्रचारामध्ये चैतन्य निर्माण करण्याचे काम केले. महायुतीच्या कार्यकर्त्यांनी आंबेगाव तालुक्यातील पारगाव येथे आढळराव पाटील यांचा विजयाचा फ्लेक्स लावला आहे, तर मंचर येथे आम आदमी पार्टीच्या वतीने खासदार कोल्हे यांच्या विजयाचा फ्लेक्स लावण्यात आला आहे. पुणे-नाशिक महामार्गावर मोशी येथे पिंपरी-चिंचवड, भोसरी येथेही डॉ. अमोल कोल्हे यांच्या विजयाचे फ्लेक्स झकळले आहेत. त्यामुळे शिरूरमधून नक्की कोण बाजी मारणार, याची उत्सुकता लागली आहे.

प्रचारात ज्येष्ठ नेते अन् कार्यकर्त्यांच्या निकालाबाबत पैजा

खुद्द शरद पवार व अजित पवार यांची प्रतिष्ठा पणाला लागलेल्या शिरूर मतदारसंघाची राज्यभर चर्चा झाली होती. त्यामुळे शिरूरमध्ये आढळराव पाटील जिंकणार की डॉ. कोल्हे पुन्हा बाजी मारणार, याची उत्सुकता आहे. निवडणुकीच्या निकालास अजून वेळ असला, तरी त्याअगोदरच दोन्ही बाजूंकडून विजयाचे दावे करण्यात येत आहेत. निकालासंदर्भात काही कार्यकर्त्यांनी पैजाही लावल्या आहेत.

## भीमाशंकर कारखान्याचे ऊस लागवड धोरण जाहीर : बाळासाहेब बेंडे



**मंचर । प्रतिनिधी**

दत्तात्रयनगर, पारगाव (ता. आंबेगाव) येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्यामार्फत सहकारमंत्री व संस्थापक दिलीप वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक मंडळाच्या निर्णयानुसार सन २०२४-२५ हंगामासाठीच्या ऊस लागवड धोरणाची अंमलबजावणी दि. २५ मे २०२४ पासून सुरू करण्यात येणार असल्याची माहिती कारखाना अध्यक्ष बाळासाहेब बेंडे यांनी दिली.

बेंडे म्हणाले, ऊस लागवडीसाठी २५ मे २०२४ ते ३१ मार्च २०२५ अखेरपर्यंतच्या कालावधीमध्ये को. ८६०३२, व्ही.एस.आय. ०८००५, एम. एस. १०००१, को. ९०५७, को. व्ही. एस. आय. १८१२१, पी. डी. एन. १५०१२, को. एम. ११०८२, को. एम. ०२६५ या ऊस जातींच्या लागवडीस परवानगी देण्यात आली आहे. तसेच मे २०२४ अखेर को. ८६०३२ या जातीच्या उसाची लागवड केलेल्या शेतकर्यांना गाळप हंगाम सन २०२४-२५ साठी तोड करावयाची असल्यास तो गाळपासाठी घेतला जाईल. त्याकरिता उसाची नोंद कारखाना शेतकी विभागीय कार्यालयात करावी.

## वादळी वाऱ्याने केळीच्या बागा जमीनदोस्त; पंचनामे करून भरपाईची मागणी

कालठण । प्रतिनिधी

इंदापूर तालुक्यातील कालठण नंबर १, कळाशी, गंगावळण, शिरसोडी, पडस्थळ येथे मंगळवारी

(दि. २१) सायंकाळी वादळी वार्यासह झालेल्या अवकाळी पावसाच्या तडाख्याने अनेक शेतकर्यांच्या केळीच्या बागा जमीनदोस्त झाल्या; तर आंबा, कांदा, ऊस पिकांचेही प्रचंड नुकसान झाले आहे. यामध्ये शेतकर्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे बाधित शेतकरी हतबल झाले असून, झालेल्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करून भरपाई देण्यात यावी, अशी मागणी केली आहे.



इंदापूर तालुक्यातील उजनी धरण पाणलोट क्षेत्रालगतच्या गावात वादळी वार्याने थैमान घातले. यात अनेक शेतकर्यांच्या केळीच्या बागा अक्षरशः जमीनदोस्त झाल्या. बागांमध्ये सध्या केळी तोडणीचे काम सुरू होते. मात्र, अचानक आलेल्या वादळी वार्यासह पावसाने बागांचे प्रचंड नुकसान झाले. पाणीटंचाईच्या काळात देखील मोठ्या कष्टाने पिकवलेली व हाता-तोंडाशी आलेली केळीची बाग डोळ्यांदेखत उद्ध्वस्त झाल्याने अनेक शेतकरी धाय मोकलून रडत होते. केळीबरोबरच कांदा, ऊस उत्पादकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतात काढून ठेवलेला कांदा भिजला आहे.

त्याचबरोबर आंब्याच्या कैर्या मोठ्या प्रमाणावर झाडावरून पडल्या आहेत, तर ऊसही झोडपला गेला असून, तो आडवा पडला आहे. त्यामुळे महसूल आणि कृषी विभागाने तातडीने नुकसान झालेल्या भागातील पिकांसह बागांचे पंचनामे करावेत. किमान एकरी एक लाख रुपयांची भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरीवर्गातून होत आहे. याशिवाय अनेक ठिकाणी मोठमोठी झाडे, विजेचे खांब उन्मळून पडले आहेत. घरे, गोठे, पोल्ट्री शेडवरील पत्रे उडून गेले आहेत. सायंकाळपासून वीजपुरवठा गायब झाला आहे. त्यामुळे गावोगावी पाणीपुरवठा करणार्या नळ पाणी योजना बंद पडल्या आहेत. रस्त्यावर पडलेली झाडे हटविण्याचे तसेच विजेचे खांब पुन्हा उभे करण्याची कामे रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

## जिल्ह्यात मतमोजणी केंद्राच्या १०० मीटर परिसरात मनाई आदेश लागू

**पुणे । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची मतमोजणी संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय्य वातावरणात पार पाडण्याच्यादृष्टीने मतमोजणी केंद्रात व त्याच्या १०० मीटर परिसरात ४ जून रोजी पहाटे ००.०१ ते मतमोजणी संपेपर्यंत जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी मनाई आदेश निर्गमित केले आहे.

मावळ लोकसभा मतदार संघाची मजमोजणी बालेवाडी स्टेडीयम, पुणे आणि बारामती लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी एफसीआय गोडावून कोरेगांव पार्क तर शिरुर लोकसभा मतदार संघाची मतमोजणी स्टेट वेअरहाऊस, गोदाम क्र., ब्लॉक पी-३९, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ रांजणगाव (कारेगांव), ता. शिरूर येथे होणार आहे.

जिल्ह्यातील सर्व मतमोजणी केंद्रात आणि १०० मीटर परिसरात सदर वेळेत भ्रमणध्वनी, लॅपटॉप, आयपॅड, मॅचबॉक्स, कॉडलेस फोन, पेजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपके, इतर इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे, कोणत्याही प्रकारची शस्त्रे सुरक्षेच्या कारणास्तव मतमोजणी कर्तव्यावर असलेले अधिकारी व कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस जवळ बाळगणे व वापरण्यास फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ अन्वये मनाई करण्यात आली आहे.

या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीवर लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ आणि भारतीय दंड विधान कायद्यातील कलम १८८ प्रमाणे दंडनीय कार्यवाही करण्यात येईल, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## चाकणला अनधिकृत होर्डिंगवर कारवाई; लोखंडी सांगाडे हटवले



**चाकण । प्रतिनिधी**

चाकण नगरपालिकेचे मुख्याधिकारी संदीप चीद्रवार यांच्या आदेशाने चाकण नगरपालिका प्रशासनाने अतिक्रमण विभागामार्फत अनधिकृत होर्डिंगविरोधात मंगळवारी (दि. २१) कारवाई सुरू केली. नगरपालिका हद्दीतील पुणे-नाशिक महामार्गावरील मोठे अनधिकृत होर्डिंग हटवण्यात आले आहेत. चाकण नगरपालिकेने सर्वच बेकायदेशीर होर्डिंगधारकांना नोटीस दिल्या होत्या. तातडीने बेकायदा होर्डिंग काढून घ्या अन्यथा नगरपालिका असे सर्व होर्डिंग स्वतः काढणार असल्याची तंबी सर्वच बेकायदेशीर होर्डिंगधारकांना नोटीसच्या माध्यमातून देण्यात आली होती.